www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 232 वा मंगळवार दि. 06 मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

## मोटार सायकलची चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल शहर परिसरातून एका मोटार सायकलची चोरी झाल्याची घटना घडली आहे.

शुभम महाडिक याने त्याच्या नावे असलेली 60 हजार रुपये किंमतीची होंडा युनिकॉर्न एबीएस मोटार सायकल क्र.एमएच-46-सीडी-5882 ही हेरिटेज मोटार्स येथे उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## भटक्या कुत्र्याला उंचावरुन फेकून घेतलेल्या जीवाबद्दल गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

एका भटक्या कुत्र्याला बिल्डींगच्या उंचावरुन फेकून त्याच्या जीव घेवून आगळीक केली म्हणून सदर इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मॅरेथॉन नेक्सॉन पळस्पे फाटा येथील बिल्डींगच्या खाली जनरेटर रुमच्या पत्र्यावर कोणत्या तरी अज्ञात इसमाने पांढऱ्या रंगाचा अंदाजे 6 ते 7 महिन्याचा उंची अंदाजे 1.5 फुट लांबी 2.5 फुट शेपटी लांब या कुत्र्यास वरुन फेकून त्याचा जीव घेतल्याबद्दल त्याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बांगलादेशीय 7 जणांविरोधात कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**


बांगलादेशीय बेकायदेशीररित्या पनवेल परिसरात वास्तव्य केल्याप्रकरणी तसेच त्यांना मदत करणाऱ्या अशा 7 जणांविरोधात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा नवी मुंबई यांनी कारवाई केली आहे.

करंजाडे येथील सेक्टर 6 या ठिकाणी आन्ना खातून आकाश गाझी उर्फ आन्ना रफिकुल इस्लाम खान (35) सोबत त्याची मुलगी सुरैना (5), आलो खातून इस्लाम खातून उर्फ आलो इस्माईल बिलाल डावर (31), किया आकाश गाझी उर्फ किया रफिकुल इस्लाम खान (21), रफिकुल इस्लाम खान उर्फ आकाश लतिफ गाझी (40) त्यांच्या सोबत त्यांची अल्पवयीन मुलगी मेघना खान (15), मोहम्मद इस्माईल अमिन्नोद्दीन येरुलकर (52) व फरार असलेला इस्माईल एस.आर. यांच्या विरोधात पारपत्र (भारतात प्रवेश) 1950 कलम 3(ए) सह 6 (ए) व विदेशी व्यक्ती अधिनियम 1946 चे कलम 14 (अ) सह कलम 318 (4), 336 (2), 338, 336 (3), 340 (2) बीएनएस अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

# मुहूर्त ठरला

## जे.एम.म्हात्रे यांचा 7 मे रोजी होणार भाजप प्रवेश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी:** शेकाप आणि महाविकास आघाडीवर नाराज असलेल्या जे.एम.म्हात्रे यांनी अखेर कार्यकर्त्यांकडून आलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करत भाजपात जाण्याचा निर्णय घेतला आहे.सात मे रोजी उलवे नोड येथे स्व.जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते आपल्या समर्थकांसह माजी मंत्री आणि प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश करणार आहेत.त्यापूर्वी त्यांनी लोकनेते मा.खा.रामशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी जावून भेट घेतली.त्यांच्याकडून हिरवा कंदील मिळाल्यावर म्हात्रे 7 मे रोजी पक्ष प्रवेश करत आहेत.दरम्यान त्यांच्यासोबत महानगरपालिकेतील काही माजी नगरसेवक,उरण मतदारसंघातील



Mr. J.M. MHATRE

काही पदाधिकारी आणि हजारो कार्यकर्ते भाजपात प्रवेश करणार आहेत.
हे असतील सोबत ?

1)प्रितम म्हात्रे ,माजी विरोधी पक्ष नेते पमपा
2)गणेश कडू,जिल्हा चिटणीस पनवेल महानगर व माजी नगरसेवक
3) प्रिती जॉर्ज,माजी नगरसेविका
4) अनुराधा ठोकळ,माजी नगराध्यक्षा
5) सुरेखा मोहोकर,माजी नगरसेविका
6) सारीका भगत,माजी नगरसेविका
7) रविंद्र भगत,माजी नगरसेवक
8) किरण दाभणे,माजी नगरसेवक
9) गणेश पाटील ,माजी उपनगराध्यक्ष
10)जीवन म्हात्रे
11) रामेश्वर आंग्रे,माजी सरपंच करंजाडे
12)जगदीश पवार,माजी पंचायत समिती सदस्य

आणि अन्य काही महत्वाचे पदाधिकारी व कार्यकर्ते

## एच.एस.सी.परीक्षेत मोरे महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेचा निकाल मंगळवार दि.०५ मे २०२५ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला. त्यात मविप्र समाज संस्थेच्या कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. विज्ञान शाखेचे १८८ पैकी १८८विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला, वाणिज्य शाखेचे ९० पैकी ९० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला तर कला शाखेचे १७७ पैकी १७१ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन ९६.६१% निकाल लागला, यात अनुक्रमे विज्ञान विभागात कापसे कृष्णा (८८.१७%), शिंदे प्रेरणा (८५.३३%), जाधव कावेरी (८४.३३%) वाणिज्य विभागात शेख जिशान (८७%), काहाने कल्याणी (८३.३३%), साळवे साक्षी (७८.७५%) कला विभागात गवळे शालिनी (८७.८३%), मौर्य प्रीया (८१%), सोनवणे रोहित (७५.३३%) हे विद्यार्थी प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, सरचिटणीस नितीनजी ठाकरे, चिटणीस दिलीप दळवी, निफाड तालुका संचालक शिवाजी गडाख, महिला संचालक शोभाताई बोरस्ते, मविप्र शिक्षणाधिकारी नितीन जाधव, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष उत्तम डेरले, प्राचार्य ज्ञानोबा ढगे, प्रवीण ढेपले,अभय वडघुले, सुनील जाधव, प्रकाश आहेर,प्रवीण शेलार, राजेंद्र जाधव, सविता कापसे, आदीसह सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## पनवेल महानगरपालिकेत लोकशाही दिन' संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयात
दिनांक 5 मे रोजी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले. या लोकशाही दिनी सात अर्ज प्राप्त झाले. नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार आज झालेल्या लोकशाही दिनी नागरी सेवा सुविधा बाबत समस्या सोडविण्यात आल्या. प्राप्त झालेल्या सातही अर्जांचे तात्काळ निराकरण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

या वेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त सर्वश्री डॉ.वैभव विधाते, रविकिरण घोडके, प्रसेनजित कारलेकर, स्वरूप खारगे, शहर अभियंता संजय कटेकर, आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर , सामान्य प्रशासन विभाग प्रमुख अमर पाटील , अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. मागील लोकशाही दिन पर्यंत प्राप्त झालेल्या 10 ही तक्रारीचे निवारण झाले असून शिल्लक तक्रारींची संख्या निरंक आहे.

## भाजप सांस्कृतिक महोत्सवात मुग्धा-प्रथमेश यांच्या मैफिलीने भरले सुरांचे रंग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या संकल्पनेतून खारघर सेक्टर १२ मधील गावदेवी मैदानावर आयोजित भाजप सांस्कृतिक महोत्सवाने रसिकांची मने जिंकली. महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी सुप्रसिद्ध गायिका मुग्धा वैशंपायन आणि गायक प्रथमेश लघाटे यांच्या सुमधुर गाण्यांच्या मैफिलीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि 'मराठी बिग बॉस'फेम अंकिता वालावलकर यांनी विशेष उपस्थिती लावली. मुग्धा आणि प्रथमेश यांनी आपल्या बहारदार आवाजाने मैफलीला साज चढवला. त्यांच्या गाण्यांना रसिकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका आरती नवघरे, हर्षदा उपाध्याय, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, विजय घरत, महिला मोर्चा शहराध्यक्ष साधना पवार, युवा मोर्चा शहराध्यक्ष नितेश पाटील, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, स्वाती कोळी, कोमल कोळी आदींसह नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संगीत



मैफिलीचा आनंद लुटला. भाजप सांस्कृतिक महोत्सवामध्ये मनोरंजन, इतिहास, कला आणि महाराष्ट्राच्या विविध भागांतील प्रसिद्ध मिसळ महोत्सवाचा अनोखा संगम पहायला मिळाला. या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामुळे नागरिकांना एक वेगळा अनुभव मिळाला.

## आता नवी मुंबईत 'एफोटेल बाय सयाजी'

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: सयाजी हॉटेल्सने नवी मुंबईतील तळोजा एमआयडीसीमध्ये एफोटेल बाय सयाजी, लाँच करण्याची घोषणा केली आहे. ही एक स्मार्ट आणि समकालीन हॉटेल आहे जी नवी मुंबईच्या सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रदेशांपैकी एकामध्ये निर्दोष आदरातिथ्य प्रदान करते. लाँचिंगबद्दल एफोटेल बाय सयाजीचे संचालक ऑपरेशन्स काशिफ मेमन म्हणाले की, आम्हाला एफोटेल बाय सयाजीसह नवी मुंबईत विस्तार करण्यास उत्सुकता आहे. आमचे उद्दिष्ट असा हॉटेल अनुभव तयार करणे आहे जो व्यवसाय कार्यक्षमता आणि विश्रांतीच्या आरामाचा समतोल साधेल. औद्योगिक आणि व्यावसायिक केंद्र म्हणून नवी मुंबईचे वाढते महत्त्व पाहता, आम्हाला विश्वास आहे की एफोटेल उत्तम किमतीत दर्जेदार आदरातिथ्य शोधणाऱ्या प्रवाशांसाठी पसंतीचा पर्याय बनेल. आणि त्यांच्या उत्साहात भर घालेल.



## साहित्यिक रमेश धनावडे यांच्या 'असेच काहीतरी' या पुस्तकाचे प्रकाशन!

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

साहित्यिक रमेश धनावडे यांच्या 'असेच काहीतरी' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच ज्येष्ठ गझलकार व साहित्यिक ए.के. शेख, ज्येष्ठ साहित्यिक व कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हा संपर्कप्रमुख एल. बी. पाटील, को.म.सा.प. अलिबाग शाखा अध्यक्षा व रायगड जिल्हा उपाध्यक्षा सुजाता पाटील, साहित्यिक रोहिदास पोटे, साहित्यिक सुभाष कटकदौंड, मुरुड को.म.सा.प. संपर्कप्रमुख संजय गुंजाळ, रायगड जिल्हा पत्रकार संघ उपाध्यक्ष नागेश कुलकर्णी, स्त्रीरोग तज्ञ व साहित्यिक डॉ. चंद्रकांत वाजे, पूनम धनावडे आणि अड. विलास नाईक व इतर मान्यवर यांच्या हस्ते झाले. रमेश प्रभाकर धनावडे यांचे शिक्षण एम.कॉम., एल एल. बी., एम.बी.ए. असे झाले असून ते



रिलायन्स इंडस्ट्रीज नागोठणे येथे डेप्युटी जनरल मॅनेजर एच. आर. (कॉर्पोरेट अफेअर्स) म्हणून कार्यरत आहेत. आजवर त्यांचे मनतरंग काव्यसंग्रह, ऊर्मी चारोळी संग्रह, जीवनगाणे ललितलेख संग्रह, कवितेच्या सुरातून हा लेखसंग्रह ही पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांचा जीवनगाणे स्तंभ दैनिक कृषीवलमध्ये सलग तीन वर्षे प्रसिद्ध होत होता तर 'गुदगुल्या' या राजकीय व सामाजिक वात्रटिका दैनिक पुढारीमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. तसेच दैनिक रायगड टाईम्ससाठी 'बी पॉझिटिव्ह' या डिजिटल मुलाखतीही प्रसिद्ध झाल्या आहेत. त्याचप्रमाणे अनेक दिवाळी अंकांमध्ये त्यांच्या कथा, लेख आणि कविता प्रसिद्ध होत असतात. त्यांनी माजी विशेष कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र शासन म्हणूनही कार्य केले आहे. तसेच आकाशवाणी मुंबई केंद्रावर अर्धा तास स्वरचित काव्यवाचनही केले आहे. ते अलिबाग लायन्स क्लब माजी प्रेसिडेंट असून सध्या ते कोकण मराठी साहित्य परिषद अलिबाग तालुका प्रतिनिधी आणि रायगड जिल्हा कार्यकारिणी सदस्य आहेत. 'गीत रामायण' व इतर अनेक कार्यक्रमांसाठी त्यांनी सूत्रसंचालन केले असून 'गोष्ट तिच्या प्रेमाची' या मराठी चित्रपटासाठी गीतकार म्हणून ही त्यांनी पदार्पण (गायिका आर्या आंबेकर) केले आहे. अखिल भारतीय साहित्य संमेलनात त्यांचा सहभाग असतो व ते अनेक शाळा कॉलेजवर प्रमुख वक्ता म्हणून व अनेक काव्यसंमेलनात कवी म्हणून आमंत्रित असतात. रमेश धनावडे यांना आजवर रायगड भूषण पुरस्कार, रायगड जिल्हा पत्रकार संघाचा र.वा. दिघे पुरस्कार, कृषीवल कौतुक पुरस्कार, दैनिक पुढारी सन्मान पुरस्कार, म. ना. पाटील साहित्य पुरस्कार, नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार संघ पुरस्कार, स्तंभ विचार परिषद पुरस्कार, सुभानराव राणे प्रतिष्ठान पुरस्कार, साहित्यसंपदा काव्यरत्न पुरस्कार, तेजस्विनी फाउंडेशन कोव्हीड योद्धा पुरस्कार, नवभारत टाईम्स/ नवराष्ट्र टाईम्स पुरस्कार, मराठी साहित्य मंडळाचा सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्कार, कोकण मराठी साहित्य परिषद प्रथम पुरस्कार असे अनेक पुरस्कार लाभले आहेत. रमेश धनावडे यांचे असेच काहीतरी हे पुस्तक मराठी साहित्यामधील एक वेगळा प्रकार आहे. "सहज सोपे वाटणारे हे लिखाण चिंतन करण्याजोगे आहे. त्यांनी निर्माण केलेल्या साहित्यात एक गर्भित अर्थ, मिश्किलपणा व ग्राफिटी सारखा प्रकार आपणास अनुभव मिळतो व त्याने रसिक वाचक निश्चितच खुश होतील" असे ज्येष्ठ गझलकार एके शेख यांनी म्हटले आहे. तसेच या पुस्तकाचे उपस्थित सर्व मान्यवरांनी भरभरून कौतुक केले आहे.

## कर्नाळा खिंडीत खासगी बसचा अपघात; एका प्रवाशाचा मृत्यू

### बस चालकाला अटक; निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल

### जखमींची आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतली भेट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

कर्नाळा खिंडीत रविवारी (दि. ४ मे) उशिरा रात्री कर्नाळा खिंडीत खाजगी प्रवासी बस पलटल्याची गंभीर घटना घडली. ओमकार ट्रॅव्हल्सच्या बसमध्ये एकूण ४९ प्रवासी होते. या अपघातात २५ प्रवासी जखमी झाले असून त्यापैकी २ जणांची प्रकृती गंभीर आहे. अमोल तळवडकर या प्रवाशाचा या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पनवेल तालुका पोलीस, अग्निशमन दल आणि स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. काही प्रवासी बसखाली अडकले होते, त्यांना जेसीबीच्या मदतीने बाहेर काढण्यात आले. सर्व जखमींना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सोमवारी (दि. ५ मे) सकाळी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी एमजीएम रुग्णालयात भेट देऊन अपघातग्रस्तांची विचारपूस केली. त्यांनी रुग्णांच्या नातेवाइकांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीबाबत माहिती घेतली. तसेच अपघातग्रस्त प्रवाशांच्या उपचारासाठी आर्थिक मदतीची



मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचेही ठाकूर यांनी जाहीर केले. अपघातप्रकरणी पुढील तपास पोलीस करीत असून, चालकावर निष्काळजीपणामुळे मृत्यू व इतर गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रविवारी रात्री झालेल्या भीषण बस अपघातानंतर पोलीस तपासाला गती मिळाली असून, अपघात घडवून फरार झालेल्या खाजगी बसचालकाला अखेर पोलिसांनी अटक केली आहे. या दुर्घटनेत एक प्रवाशाचा मृत्यू झाला असून, १४ प्रवासी सध्या एमजीएम रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यापैकी दोन प्रवशांची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. ओमकार ट्रॅव्हल्सची ही बस मुंबईहून कोकणात जात असताना कर्नाळा घाटात रात्री ११ वाजता उलटली होती. अपघातानंतर चालक पळून गेला होता. मात्र स्थानिक पोलीस आणि गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या शोध मोहिमेनंतर त्याला आज सकाळी अटक करण्यात आली. अपघातानंतर जखमींवर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात तातडीने उपचार सुरू करण्यात आले.



## राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघाचा प्रथम वर्धापन दिन संपूर्ण देशभरात वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून होणार साजरा....राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा/प्रतिनिधी**
**करण धोंगडे**



अल्पावधीतच महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशभरात युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या माध्यमातून हजारो पत्रकारांची टीम बनवून त्यांना एकत्र आणून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी देश पातळीवर अत्यंत वेगाने पसरत असलेली देशव्यापी संघटना म्हणजे युवा ग्रामीण पत्रकार संघाची ओळख आहे.याच युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचा ५ जूनला प्रथम वर्धापन दिन संपूर्ण देशभरातून वेगवेगळ्या राज्यात सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून साजरा केला जाणार आहे. आरोग्य तपासणी शिबिर,रक्तदान शिबिर,ग्रामीण तसेच शहरी भागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,शाळकरी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप,सामाजिक,राजकीय सांस्कृतीक,शैक्षणिक,अध्यात्मिक,वैद्यकीय, कृषी तसेच प्रत्येक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण काम करणाऱ्यांचा सत्कार व पत्रकारांना सन्मान या वर्धापन दिनी संघटनेच्या माध्यमातून देशभरात होणार आहे. सध्या देशभरातील महाराष्ट्र,उत्तर प्रदेश,मध्य प्रदेश,बिहार ,छत्तीसगड,झारखंड,हिमाचल प्रदेश,पंजाब,दिल्ली,कर्नाटका,तामिळनाडू, आंध्र प्रदेश,तेलंगाना,आसाम,गुजरात,राजस्थान,हरियाणा इत्यादी राज्यात युवा ग्रामीण पत्रकार संघ कार्यरत आहे २०२५ हे वर्ष संपण्याआधी संपूर्ण भारतभर म्हणजेच भारतातील संपूर्ण राज्यामध्ये युवा ग्रामीण पत्रकार संघ असल्याचे आपणास पहावयास मिळेल असे आश्वासन राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी दिली आहे. समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असलेले युवा ग्रामीण पत्रकार संघ खरोखरच त्यांच्या माध्यमातून संपूर्ण देशभरातून पत्रकारांबरोबरच गोरगरीब जनतेला न्याय देण्याचे काम करत आहे,त्यामुळे संपूर्ण देशभरातून हजारोच्या संख्येने पत्रकार बांधव संघटनेस जुळत आहे. महाराष्ट्रामध्ये तर तालुका व जिल्हानिहाय जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन करून त्यांच्या माध्यमातून पत्रकारांच्या समस्या सोडवून,गोरगरीब जनतेला न्याय देण्याचं काम युवा ग्रामीण पत्रकार संघ करत आहे.आपली कुणाशीही स्पर्धा नसून आपले ध्येय,उद्दिष्ट समोर ठेवून काम करत राहावे असे आवाहन राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या सर्व सदस्य व पदाधिकाऱ्यांना दिले.

## कल्याणमध्ये एम.बी.ए कॉलेज

**दैनिक युवक आधार**
**कल्याण प्रतिनिधी**
**-गुरुनाथ तिरपणकर**

कल्याण आणि आजुबाजूच्या तालुक्यातील तरुणांना भविष्यात सक्षम बनविण्यासाठी एमबीए अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अचिव्हर्स कॉलेजला एआयसीटीईची मान्यता मिळाली आहे. कल्याणमधील अचिव्हर्स कॉलेज ऑफ कॉमर्स अण्ड मॅनेजमेंटचे संस्थापक प्राचार्य डॉ.सीए महेष भिवंडीकर आणि उपप्राचार्या,एमबीए प्रोग्राम कोऑर्डिनेटर कु. सोफिया डिसुझा यांच्या नेतृत्वाखाली मुंबई विद्यापीठाच्या मार्गदर्षक तत्त्वांनुसार, मास्टर ऑफ बिझनेस अडमिनिस्ट्रेषन एमबीए अभ्यासक्रमाला अधिकृत मान्यता "ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेषन" कडून मिळालेली आहे.

उच्च दर्जाचे उदयोग केंद्रीत आणि जागतिक स्तरावर व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यासाठी कॉलेज तयार झाले आहे. तसेच देवू केलेल्या नवीन शैक्षणिक अभ्यासक्रमाबाबत अचिव्हर्स कॉलेजचे उद्दिष्ट कल्याण आणि आजूबाजूच्या तालुक्यामध्ये पदव्युत्तर व्यवसाय षिक्षणाचे स्वरुप बदलण्याचे असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना वेगवान व्यवसाय जगात नेतृत्व करण्यास, नाविन्यपुर्ण होण्यास आणि यषस्वी होण्यास सक्षम बनविणाऱ्या व्यावसायिक पदवी कार्यक्रमात प्रवेष मिळेल.एमबीए अभ्यासक्रमाची सुरुवात ही अचिव्हर्स कॉलेजची शैक्षणिक उत्कृष्टता, नाविन्यपुर्णता आणि समावेषक प्रषिक्षणासाठीची वचनबध्दता प्रतिबिंबित करते. जेणेकरुन कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, उल्हासनगर आणि इतर सभोवतालच्या भागातील इच्छुक विद्यार्थ्यांना याचा फायदा घेता येईल.



# कार्यकर्त्यांच्या मुख्य प्रवाह जाण्याच्या आग्रहात्सव करणार भाजमध्ये प्रवेश- माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर

पनवेल, उरण व खालापूर विभागातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक पनवेल मधील कार्यालयात घेतली असता सर्व एक मुखाने मुख्य प्रवाहात सामील होण्याचे आग्रह धरल्याने व या संदर्भात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याशी चर्चा केल्यावरच भाजपमध्ये प्रवेश करण्याचे आम्ही निश्चित केले असून येत्या ७ मे रोजी स्वर्गीय जनार्दन भगत साहेब यांच्या पुण्यतिथीच्या कार्यक्रमानिमित्त आम्ही आमच्या सर्व समर्थकांसह भाजपमध्ये जाहीर प्रवेश करत असल्याची घोषणा माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांनी सोमवारी सायंकाळी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये केली.

विधानसभा निवडणुकीनंतर शेकापक्षाच्या आडमुठे धोरणावर पक्षाचे जेष्ठ नेते व आर्थिक बाजू भक्कमपणे



सांभाळणारे उद्योजक जे. एम. म्हात्रे उर्फ भाऊ यांनी सोमवारी तातडीने बोलावलेल्या समर्थक, कार्यकर्त्यांच्या बैठकीनंतर असंख्य समर्थकांनी पुढील राजकारणात मुख्य प्रवाहासोबत जाण्याचा मनोदय व्यक्त केला. पर्यायाने भाजपमध्येच जावे, असा आग्रह सर्वच समर्थकांनी केल्यामुळे अखेर जे. एम. म्हात्रे यांनी भाजपमध्ये जाण्याचा निर्णय घेतला आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याशी चर्चा केल्यानंतर भाजप प्रवेशाची तारीख व वेळ जे एम म्हात्रे यांनी जाहीर केली. गेले काही दिवस शेतकरी कामगार पक्षाच्या धेय्य -धोरणावर जे. एम. म्हात्रे यांनी नाराजी व्यक्त केली. आपल्याला अपेक्षित असलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे मिळत नसल्यामुळे महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय गेल्या आठवड्यात त्यांनी घेतला होता. रविवारी झालेल्या पत्रकार परिषदेतही त्यांनी आपण अजूनही शेकापमध्ये असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर सोमवारी तातडीने आपल्या समर्थकांची बैठक पनवेल येथील गुरुशरनम कार्यालयात बोलावली. या बैठकीला शेकापचे अनेक मान्यवर आणि पदाधिकाऱ्यांनी हजेरी लावली होती. यावेळी सुद्धा जे एम म्हात्रे यांनी आपली भूमिका जाहीर करून उपस्थितांकडून त्यांची मते जाणून घेतली असता त्यांनी सुद्धा भाजपमध्ये जाण्यास समर्थन दिल्याने आज आम्ही भाजपात जात असल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी पनवेल महानगरपालिका जिल्हा चिटणीस गणेश कडू, माजी विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, कार्यालयीन चिटणीस जितेंद्र म्हात्रे, माजी नगराध्यक्ष अनुराधा ठोकळ, माजी नगरसेवक सुनील बहिरा, रवींद्र भगत, प्रीती जॉर्ज-म्हात्रे, पुष्पलता मढवी,सारिका म्हात्रे, सुरेखा मोहोकर, उद्योगपती हरिश्चन्द्रसिंघ सग्गु, माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, विलास मोहकर, युवानेते जॉर्ज, एल.टी. पाटील, यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी बोलताना जे.एम. म्हात्रे यांनी सांगितले की, माझ्या सोबत प्रवेश करणाऱ्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भाजपमध्ये योग्य तो न्याय व मानसन्मान मिळेल अशी ग्वाही जे.एम .म्हात्रे यांनी दिली तर प्रीतम म्हात्रे म्हणाले की, नागरी प्रश्ना सोडवण्यासाठी आम्ही आग्रही होतो व आता सुद्धा पाठपुरावा करून हे प्रश्न सोडवू व कोणत्याही अपेक्षेने व पदाच्या लालसेने आम्ही भाजप मध्ये प्रवेश करत नसल्याचे सांगितले. तसेच गणेश कडू यांनीसुद्धा आपल्या भावना व्यक्त करत असताना शेकाप सोडताना मनाला वेदना होत असल्याची भावना व्यक्त केली.

# वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद शाळा आवरे येथे शैक्षणिक साहित्य वाटप.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड**

जगातील खरा आनंद हा दुसऱ्याला देण्यात असतो कारण आपल्या देण्याच्या दातृत्वच्या कृतीने जर दुसऱ्याला किंवा गरजवंताला लाभ होत असेल तर असे कार्य हे ईश्वराच्या दरबारात प्रिय असते. निमित्त होते सुयश क्लासेस आवरे चे अध्यक्ष निवास गावंड याच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून रायगड जिल्हा परिषद शाळा आवरे येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या मध्ये प्रामुख्याने सातवी च्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ पर साहित्य शैक्षणिक पॅड पट्टी व पेन अस साहित्य देण्यात आलं वाढदिवस म्हटला की पार्टी या सर्व गोष्टीवर मात करत निवास गावंड सर गेले बारा वर्ष आपला वाढदिवस साध्या पद्धतीने साजरा करून त्यावर वायफळ खर्च न करता त्याच पैशातून सामाजिक बांधिलकी म्हणून नेहमीच आपला वाढदिवस वेगळ्या पद्धतीने साजरा करत असतात आज देखील आपल्या वाढदिवसाच्या औचित्य साधत रायगड जिल्हा परिषद आवरे शाळेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या वाटप करण्यात आले सदर प्रसंगी विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक गणेश गावंड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना निवास गावंड सर हे उत्तम शिक्षक तर आहेत पण विविध प्रकारच्या कला त्यांच्यात आहेत तर नागेंद्र सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना रा जि प शाळा ही अतिशय चांगल्या प्रकारची शाळा आहे. शाळेतील शिक्षक गुणवंत आहेत व मला या विभागात प्लास्टिक मुक्त अभियान राबवायच आहे तर बबन पाटील सर यावेळी शाळेत होणारे विविध उपक्रम या बाबत चर्चा करून वाढदिवसाच्या भरभरून शुभेच्छा दिल्या. सदर प्रसंगी रा जि प शाळा आवरे चे मुख्याध्यापक



बबन पाटील, शिक्षक निर्भय म्हात्रे सर , गणेशप्रसाद गावंड सर ,अरुणा पाटील मॅडम , सीमा कोल्हे मॅडम, पूजा चव्हाण,मॅडम आहेर सर, तसेच शालेय कमिटी सदस्या अलका गावड, राजेश्री पाटील, सदाबहार दोस्ती ग्रुप चे हरिश्चंद्र म्हात्रे,निवास गावंड सर ,सारडे विकास मंच चे अध्यक्ष नागेंद्र म्हात्रे सर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री निर्भय म्हात्रे सर यांनी केले.




पनवेल येथील ललित कला केंद्र ह्या साहित्य, कला क्षेत्रात गेली अनेक वर्षे कार्यरत असणाऱ्या नामांकित संस्थेच्या वतीने आपल्या पेबल्स २ सोसायटीतील ज्येष्ठ सदस्य,साहित्यिक,कवी श्री श्रीनिवास गडकरी ह्यांना काल झालेल्या समारंभात *कोकण साहित्य रत्न पुरस्कार* देऊन गौरविण्यात आले. श्री गडकरी ह्यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील साहित्यिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

**( छाया दैनिक युवक आधार )**

# ऐरोलीत जातीनिहाय जनगणनेच्या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत; जल्लोषात कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ९४ वर्षांनंतर अखंड भारतात "जातीनिहाय जनगणना" करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी ऐरोलीत जल्लोष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भाजपा ऐरोली मंडळ अध्यक्ष राजेश गजानन मढवी यांच्या वतीने हा कार्यक्रम से.६ मधील जनसंपर्क कार्यालयात पार पडला.या कार्यक्रमाला राज्याचे वनमंत्री व आमदार नामदार गणेश नाईक यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच नवी मुंबई जिल्हा सरचिटणीस व भाजपा महामंत्री अनंत सुतार यांची प्रमुख उपस्थिती



लाभली. भाजपा पदाधिकाऱ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वनमंत्री गणेश नाईक यांचे पोस्टर्स हातात घेऊन घोषणाबाजी करत जल्लोष केला. या प्रसंगी मंडळ अध्यक्ष राजेश मढवी, समाजसेवक अरुण पडते, दिनेश पारख, दीपक पाटील, सुदर्शन जिरगे, भरत मढवी, जितेंद्र पारेख, अजय सिंग, चिंतामण केणी, नंदकिशोर मढवी, श्याम कोटकर, चारुदत्त ठाणांबीर, केतन सावंत, विकास रावत, निलेश वानखेडे, गुरुनाथ वाघमारे, अजित विश्वकर्मा, संदीप नामवाड, रेश्मा राजेश मढवी, अड. संध्या सावंत, अनिता पाटील, शर्मिला केणी, वत्सला रावत, निमा खंडागळे, वैशाली पाटील, जयश्री पाटील, किरण सिंग व इतर मान्यवर उपस्थित होते.प्रसंगी माध्यमांशी बोलताना भाजपा जिल्हा सरचिटणीस अनंत सुतार म्हणाले, "देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची मान उंचावणारा आणि सामान्य जनतेच्या हिताचा निर्णय घेतला आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे देशभरात आनंदाचे वातावरण आहे. ऐरोलीतही मंडळ अध्यक्ष राजेश मढवी यांच्या पुढाकाराने हा आनंदोत्सव साजरा केला गेला."समाजसेवक अरुण पडते यांनी सांगितले, "पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतलेला निर्णय हा देशहिताचा आहे. संपूर्ण देशात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून आणि नवी मुंबईत लोकनेते गणेश नाईक यांच्या नेतृत्वाखाली जल्लोष केला जात आहे. आम्ही त्यांच्या या निर्णयाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो."या कार्यक्रमात महिलांचा आणि तरुणांचा विशेष सहभाग दिसून आला. भारत देशात भूतो न भविष्यति असा निर्णय पंतप्रधान मोदींनी घेतला आहे. केंद्र शासनाने घेतलेल्या या निर्णयाचे जोरदार स्वागत सुरू आहे. या निर्णयाची खरोखर गरज होती. त्याच निमित्ताने आम्ही जल्लोष कार्यक्रम घेतला आहे. - **राजेश मढवी, ऐरोली मंडळ अध्यक्ष**

# पत्रकारांच्या मागण्या सोडविण्यासाठी पुर्ण शक्तीने उभा राहील

## माजी अर्थमंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांचे प्रतिपादन

## ३ व ४ मे रोजी भद्रावती येथे पत्रकारांचे राज्यस्तरीय अधिवेशन उत्साहात

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:- जितेंद्र खोडे** पत्रकारिता करीत असतांना पत्रकारांना अनेक अडचणी येतात. पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी मी नेहमी प्रयत्नरत असतो. या अधिवेशनामध्ये पत्रकारांचे मांडलेले ठराव,प्रस्तावातील मागण्या सोडविण्यासाठी पुर्ण शक्तीने उभा राहील असे आश्वस्त करतो असे प्रतिपादन माजी अर्थमंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले. अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने ३ व ४ मे रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील राजमनी गार्डन व लॉन, रेल्वे स्टेशन रोड,भद्रावती येथे पत्रकारांचे दोन दिवसीय खुले राज्यस्तरिय अधिवेशन आयोजित केले होते.या अधिवेशनात माजी अर्थमंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी ऑनलाईन प्रणालीव्दारे उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले. या अधिवेशनाचे उद्घाटन ४ मे रोजी सकाळी झाले. आदिवासी विकास मंत्री प्रा.अशोक उईके यांनी ऑनलाईन पध्दतीने अधिवेशनाचे उद्घाटन करून शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी




अ.भा.ग्रा. पत्रकार संघाचे संस्थापक केंद्रीय अध्यक्ष मनोहर सुने होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेशाध्यक्ष कैलासबापू देशमुख,मिशन आयएएसचे संचालक प्रा.नरेशचंद्र काठोळे,शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय,नागपूर चे अधिष्ठाता प्रा.डॉ. विश्वनाथ साबळे, नेत्रतज्ज्ञ डॉ. चेतन खुटेमाटे, फेडरेशन ऑफ असोसिएशनचे मधुसुधन रूंगठा,सामाजिक कार्यकर्ते राम आखरे,चंद्रशेखर भडांगे,जनमंच अध्यक्ष राजीव जगताप आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात आदिवासी नृत्याने करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष कैलासबापू देशमुख यांनी प्रास्ताविक करीत संघटनेची माहिती दिली. संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने यांनी मनोगत व्यक्त करतांना म्हटले की,गेल्या ३० वर्षापासून अ.भा.ग्रा. पत्रकार संघ पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी लढा देत आहो.काही मागण्या मान्य झाल्या असुन बऱ्याच मागण्या प्रलंबित आहे. त्यामुळे प्रलंबित मागण्यांसाठी यापुढे आंदोलन सुध्दा उभारू असे मत त्यांनी व्यक्त केले. यानंतर मंचावरील उपस्थित इतरांनीही मनोगत व्यक्त केले. व्दितीय सत्रात जेष्ठ समाजसेवक पद्मश्री डॉ. अभय बंग, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्रा. डॉ. विनायक तुमराम,माजी विरोधी पक्षनेते,महाराष्ट्र विधानसभा, माजी कॅबिनेट मंत्री तथा आमदार ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघ मा.श्री.विजय वडेट्टीवार जेष्ठ साहित्यिका उषाकिरण आत्राम आदींची उपस्थिती होती. यादरम्यान फ्रेम या स्मरणिकेचा प्रकाशन सोहळा पार पडला. या अधिवेशनात संस्थापक अध्यक्ष मनोहर सुने यांनी विविध ठराव मांडल्यानंतर ते पारीत करून शासन दरबारी व लोकप्रतिनीधींकडे पाठविण्यात आले. यावेळी रमेश थोरात,सदानंद बोरकर,प्रा.पंकज इटकेलवार,प्रा. विकास जोशी, परमानंद तिराणीक यांचा सन्मानचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. तृतीत सत्राच्या अध्यक्षस्थानी चंद्रपुरचे आमदार किशोर जोरगेवार हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार डॉ. नामदेव उसेंडी (गडचिरोली), अ.भा.ग्रा. पत्रकार संघाचे केंद्रीय उपाध्यक्ष राजेंद्र भुरे, प्रदीप जोशी, सचिव अशोक पवार, अशोक यावूल, प्रा.रवींद्र मेंढे, बाबाराव खडसे, बाळासाहेब सोरगीवकर,अभिमन्यू भगत,अड. किरण भुते, माणिकराव ठाकरे, रमाकांत मोरे केंद्रीय संपर्क प्रमुख (मध्यप्रदेश), प्रदेश सल्लागार अरुण कुलथे,प्रदेश सरचिटणीस राजेंद्र ठाकरे, प्रदेश सचिव गोपाल सरनायक, प्रदेश कार्यालय प्रमुख मंगेश राजनकार , मनोज कामटे प्रदेश संघटक,महिला मंच प्रदेश अध्यक्षा प्राचार्य डॉ मंजुषा सागर, महिला मंच प्रदेश सरचिटणीस सौ कांचन मुरके, प्रसिध्दी प्रमुख शहजाद खान आदींची उपस्थिती होती. यावेळी महिला मंचची कार्यकारीणी घोषीत करण्यात आली व सत्कार सोहळा सुध्दा पार पडला. चंद्रपुरचे आमदार किशोर जोरगेवार यांनी आपल्या भाषणातून पत्रकारांच्या समस्या शासन दरबारी मांडून त्याचा पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन दिले.सदर अधिवेशनाचे संयोजक रविंद्र तिराणीक होते.तत्पुर्वी ३ मे रोजी रात्री ७ वाजता नटश्रेष्ठ निळू फुले फाउंडेशन,अकोला प्रस्तुत ब्लॅक कॉमेडी एकपात्री ‘बकरी शेर खा गई‘ चा प्रयोगाचे सादरीकरण दिग्दर्शक, लेखक डॉ.रमेश थोरात यांनी केले. तसेच परमानंद तिराणीक यांनी एकपात्री नाटकाचे सादरीकरण केले. या अधिवेशनाला संपुर्ण महाराष्ट्रातील पत्रकार बंधू उपस्थित होते. अधिवेशनाच्या यशस्वीतेकरीता चंद्रपुर जिल्ह्यातील अ.भा.ग्रा. पत्रकार संघाचे पदाधिकारी, सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रज्ञा जिवनकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.रविंद्र मेंढे व संयोजक रविंद्र तिराणीक यांनी केले.

# नाशिक मध्ये पत्रकार पदविका कोर्स पदवीदान समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

नाशिक (४ मे २०२५): दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने आयोजित पत्रकार पदविका कोर्सच्या पदवीदान समारंभाचा भव्य सोहळा नाशिकमधील कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या विशाल हॉलमध्ये उत्साहात पार पडला. या समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून न्यूज १८ लोकमत मुंबईचे संपादक मा. श्री. मंदार फणसे, वकीलनामा यूट्यूब चॅनलचे संस्थापक व सायबर कायदे तज्ज्ञ मा. ॲड. अद्वैत चव्हाण, तसेच कोर्सच्या संचालिका सौ. कृतिका संदीप मराठे उपस्थित होते. समारंभात मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पत्रकारितेतील नवे मार्गदर्शन दिले व त्यांच्या जबाबदाऱ्यांवर प्रकाश टाकला. यावेळी पत्रकारितेच्या क्षेत्रातील नव्या संधी, समाजातील माध्यमांची भूमिका, आणि जबाबदाऱ्यांचे महत्व यावर सखोल मार्गदर्शन केले. संचालिका सौ. कृत्तिका मराठे यांनी त्यांच्या भाषणात पत्रकार पदविका कोर्सचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना फक्त पुस्तकी ज्ञान देण्यापुरता मर्यादित न ठेवता, त्यांना प्रत्यक्ष पत्रकारितेच्या क्षेत्रात लागणारे व्यावहारिक कौशल्य, प्रसारमाध्यमांचे कार्यपद्धतीचे अनुभव आणि तांत्रिक ज्ञान प्रदान करणे हा आहे. यावेळी एप्रिल बॅच च्या 50 विद्यार्थ्यांना पदविका प्रदान




करण्यात आले. विद्यार्थ्यांना विविध माध्यम प्रकारांमध्ये (प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल) काम करण्याची तयारी करून देणे, त्यांना जबाबदार पत्रकार बनवणे, तसेच समाजातील घडामोडींबाबत संवेदनशील दृष्टिकोन निर्माण करणे हे या कोर्समागील मुख्य उद्दिष्ट आहे असे सागितले, तसेच लवकरच हिंदीमध्ये हा कोर्स चालू करण्याचे ही घोषणा त्यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. संचालिका

नवोदित पत्रकार बंधू-भगिनींना अभिनंदन आणि भावी वाटचालीसाठी शुभेच्छा देत समारंभाची सांगता झाली.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

# तळणी गावात ग्रामस्वच्छता आणि निबंध स्पर्धेने 'कृषी संजीवनी' उपक्रमास उत्साही प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**राजू शिंदे**
**मराठवाडा प्रतिनिधी प्रमुख**

– नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत लोकसहभागातून सूक्ष्म नियोजनाच्या तिसऱ्या दिवशी तळणी येथे सोमवारी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात बस स्टँड परिसरात ग्रामस्वच्छता अभियानाने करण्यात आली. या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्वच्छता अभियानासाठी तळणीतील डॉक्टर असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते. या अभियानात सरपंच गौतम सदावर्ते, ग्रामपंचायत सदस्य सुधाकर सरकटे, ग्रामसेवक राजेंद्र डोईफोडे , कृषी सहाय्यक विजय खोडके, तलाठी प्रशांत हरिश्चंद्रे , आदींनी सहभाग घेतला. स्वच्छतेनंतर जमा झालेला कचरा जेसीबीच्या साहाय्याने उचलून घंटागाडीने योग्य ठिकाणी नेण्यात आला. यानंतर शालेय विद्यार्थ्यांसाठी 'माझ्या स्वप्नातील गाव' या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेतून तीन विजेते निवडण्यात आले असून त्यांचा गौरव समारोप सोहळ्यात ७ मे रोजी केला जाणार आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कल्पकतेतून ग्रामविकासाविषयी मांडलेल्या भावना ऐकून ग्रामस्थ भारावून गेले. या दिवशी गावातील दोन विहिरींची पाणी पातळी मोजण्यात आली, तसेच प्रकल्पासाठी आवश्यक असलेले दोन माती नमुनेही घेण्यात आले. दिवसाचा समारोप शिवार फेरीने करण्यात आला.



## कांदा निर्यातबंदी आंदोलन प्रकरणात माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांच्यासह पाच आंदोलकांची निर्दोष मुक्तता


**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर:-** केंद्र सरकारने 2020 साली घेतलेल्या कांदा निर्यातबंदीच्या निर्णयाच्या विरोधात राज्यभर शेतकरी असंतोषाने पेटून उठले होते. याच पार्श्वभूमीवर रयत क्रांती संघटनेचे संस्थापक व माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी इतर शेतकरी कार्यकर्त्यांसह विंचूर बाजार समिती परिसरात आंदोलन केले होते. या आंदोलनादरम्यान झालेल्या गोंधळामुळे लासलगाव पोलीस ठाण्यात सदाभाऊ खोत व इतर पाच आंदोलकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरण न्यायप्रविष्ट झाल्यानंतर चार वर्षांनी, निफाड न्यायालयाने दिनांक ५ एप्रिल २०२५ रोजी या प्रकरणाचा निकाल दिला. न्या. स्नेहा देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालील न्यायालयाने सदाभाऊ खोत यांच्यासह पाचही आंदोलकांची निर्दोष मुक्तता केली आहे. या खटल्यात एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले, मात्र त्यांच्या साक्षांमधून आंदोलकांकडून कोणतेही बेकायदेशीर कृत्य झाल्याचे ठोस पुरावे सादर होऊ शकले नाहीत. वकील विनोद गुंजाळ व नरेंद्र आहेर यांनी बचाव पक्षाचे कामकाज समर्थपणे हाताळले. त्यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना आंदोलन हा शेतकऱ्यांचा लोकशाही अधिकार असून, तो शांततेच्या मार्गाने पार पडल्याचे अधोरेखित केले. या निकालानंतर सदाभाऊ खोत यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, "हा निकाल म्हणजे शेतकरी संघर्षाची व लोकशाही मूल्यांची विजयगाथा आहे. आम्ही हे आंदोलन शेतकऱ्यांच्या हक्कासाठी केले होते, आज न्यायालयाने आमच्यावरचा ठपका फेटाळून लावल्याने आम्हाला न्याय मिळाला आहे." या निकालामुळे शेतकरी संघटनांमध्ये समाधान व्यक्त होत असून, हा निर्णय भविष्यातील शेतकरी आंदोलनांना नवीन प्रेरणा देणारा ठरेल, असे मत विविध ठिकाणांहून व्यक्त करण्यात येत आहे.



## श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय रिसोडच्या विद्यार्थ्यांचे सुयश !



**दैनिक युवक आधार**
**रिसोड(प्रतिनिधी)**

**रणजीत सिंह ठाकुर :-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च 2025 चा निकाल दि 5 मे रोजी ऑनलाइन पद्धतीने जाहीर झाला असून, यामध्ये श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड च्या विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे.

या कनिष्ठ महाविद्यालयातील मराठी कला, उर्दू कला,वाणिज्य व विज्ञान शाखेतील एकूण 255 विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. यापैकी 248 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल 97.25 % इतका लागला आहे.

यामध्ये विज्ञान शाखेतुन कुमारी साक्षी पंढरी तिखे ही 80.83 % गुण मिळवुन प्रथम आली, तर विज्ञान शाखेतून कु. धनश्री विश्वास कातुरे 80.00 % द्वितीय, कु. अनिषा अनिलराव सरनाईक व कु. मनीषा भिमराव इंगळे ह्या विद्यार्थीनी 78.17% तृतीय आल्या आहेत. वाणिज्य शाखे मधून प्रथम कु.जया गणेश हटकर 74.17%, द्वितीय ज्ञानेश्वर भारत तांबिले 71.17 % तर तृतीय हर्षल सुनील लोमटे 70.67 % आला आहे.

कला शाखा (उर्दू) मधून कु. हुमा परविन इमरोज खान 77.83 % प्रथम, कु. मुस्कान परवीन शेख गफूर 64.33 % द्वितीय, व कु.अशमिरा बी शेख हमीद 63.67 % तृतीय आली आहे. कला शाखा (मराठी) मधून रामेश्वर प्रकाश गोरे 82.67 % गुण घेऊन प्रथम आला आहे. शिवतीर्थ मोतीराम पवनकर 77.17 % द्वितीय व कु. प्रतीक्षा रुपराव खंडागळे 77.00 % गुणासह तृतीय आली आहे. या कनिष्ठ महाविद्यालयातील एकूण 255 विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी 14 विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाले.119 विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत तर 109 विद्यार्थी द्वितीय श्रेणीत व 15 विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष तथा शिक्षक आमदार अड.श्री किरणराव सरनाईक, श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम चे सर्व सन्माननीय पदाधिकारी तसेच श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय रिसोड चे शाळा समिती संचालक श्री पंजाबराव देशमुख, श्री जितेंद्रकुमार दलाल,श्री संजयकुमार जीरवणकर, प्राचार्य श्री संजयराव देशमुख, उपमुख्याध्यापक श्री संजयराव नरवाडे, पर्यवेक्षक श्री. गजाननराव भिसडे यांनी अभिनंदन केले आहे.

## चिपळूण ज्येष्ठ नागरिक संघ चिपळूणचा मासिक स्नेहमेळावा संपन्न

**दैनिक युवक आधार**
**योगेश सुतार**

**चिपळूण प्रतिनिधी** -- ज्येष्ठ नागरिक संघ, चिपळूणचा एप्रिल महिन्यातील स्नेहमेळावा संघाच्या कार्यालयात संघाचे उपाध्यक्ष सुरेश जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.यावेळी मंचावर सचिव रत्नमाला कळंबटे,कोषाध्यक्ष विजय बापट,अशोक भुस्कुटे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून सारस्वत बँकेचे व्यवस्थापक श्री.चांदोरकर सर उपस्थित होते.त्यांच्या बरोबर सहायक अधिकारी श्री. सुर्वेही उपस्थित होते.सुरेश जाधव यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रथम काश्मीर मधील पेहलगाम येथे झालेल्या हल्याचा संघातर्फे निषेध करण्यात आला.त्यावेळी मृत्युमुखी पडलेल्या बांधवांना आणि संघाचे दिवंगत सभासद वारे गुरुजी,शुभांगी वेस्वीकर यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली.त्यानंतर संघाचे सभासद अशोक भुस्कुटे यांची दिव्यांग समन्वय समितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. नंतर एप्रिलमध्ये वाढदिवस असलेल्या उपस्थित सभासदांना गुलाबपुष्प देऊन, त्यांचे औक्षण करून आणि नंतर केक कापून वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. याचे नियोजन सौ.नीला पेंडसे,मंजिरी नरवणे,अंजली गोंधळेकर यांनी केले होते. सारस्वत बँकेचे व्यवस्थापक चांदोरकर सरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बँकेच्या विविध योजनांबद्दल माहिती दिली आणि सध्या ज्येष्ठ नागरिकांच्या डिजिटल मीडिया मार्फत होणाऱ्या फसवणुकीपासून सावध रहाण्या विषयी मार्गदर्शन केले.बळवंत डंबे, अपर्णा कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले.विजयालक्ष्मी भोसले यांच्या कीर्तन - पूर्वरंगाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. माधवी वैद्य यांनी जेवणा संदर्भातील पत्रिका वाचली. एका सभासदांनी कविता वाचन केले.सौ.नीला पेंडसे,संभाजी ढवण आणि बळवंत डंबे यांनी संघाला देणगी दिली. या कार्यक्रमाला एकूण ४८ सभासद उपस्थित होते.प्रत्येकाला सारस्वत बँकेकडून एकेक डायरी भेट म्हणून देण्यात आली.उन्हाळा असल्यामुळे अल्पोपहारात आंबा डाळ आणि गारेगार पन्हं यांचा समावेश होता. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ. कुंदा भागवत,उदय वेल्हाळ,लक्ष्मण कांबळे,मधुकर तेरेदेसाई, प्रताप गजमल,प्रकाश आंबुर्ले,बजरंग दाभोळे यांनी सहकार्य केले.उस्मान बांगी,नंदकुमार तांबे,माधवी भागवत,दिलीप पाटील, अ गनी वनकर यांनी कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.



## विंचुरमध्ये धान्य व्यापाऱ्याची आठ लाखांची फसवणूक

### फसवणूक प्रकरणी लासलगाव पोलिसांत गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचुर :-** विंचुर येथील धान्य व्यापाऱ्याची तब्बल ८.३६ लाख रुपयांची फसवणूक झाल्याची घटना उघडकीस आली आहे. 'स्वराज्य ट्रेडर्स' या आडत दुकानाचे मालक सुशांत पोपट खुटे रा.उर्धुळ, ता. चांदवड यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, शुभम प्रकाश काळे रा. देशमाने, ता. येवला या परिचित व्यापाऱ्याने सोयाबीन खरेदीच्या बहाण्याने त्यांच्याकडून पैसे उकळले. दि. ६ एप्रिल रोजी शुभम काळे याने खुटे यांच्याशी संपर्क साधून, चार-पाच ट्रक सोयाबीन विक्रीसाठी उपलब्ध असल्याचे सांगितले. त्यानुसार खुटे यांनी एका ट्रकसाठी व्यवहार निश्चित केला. पुढे दोन ट्रक घेण्याचे ठरवून, रोख व ऑनलाईन पद्धतीने अनुक्रमे ५ लाख आणि ३.२५ लाख रुपये योगेश विठ्ठल जगताप रा.वाकद, ता. निफाड यांच्या खात्यावर पाठवले. पैसे मिळाल्यानंतरही माल न पोहोचल्याने खुटे यांनी चौकशी केली असता, शुभमने दिलेला ट्रक नंबर आणि चालकाचा मोबाईल नंबर फर्जी असल्याचे आढळून आले. शिवाय वेफको वजन काट्यावर दाखवलेली पावतीही बनावट असल्याचे स्पष्ट झाले. या संपूर्ण व्यवहारात हर्षद पाटोळे या नावाचा काल्पनिक व्यक्ती देखील समोर आला आहे.

त्यानंतर खुटे यांनी पोलिसात तक्रार दाखल केली असून, फसवणूक रकमेचा एकूण आकडा ८ लाख ३६ हजार २२० रुपये आहे. या प्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक आबासाहेब हांडाळ पोलीस हवालदार किशोर लासुरकर करत असून, त्यांना सपोनि भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# गिरणी कामगारांच्या प्रश्नांची दखल

**दैनिक युवक आधार**

**चिपळूण (प्रतिनिधी):** गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाबाबत १ मे पर्यंत शासनाने लक्ष न दिल्यास एल्गार आंदोलनाचा इशारा राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या बैठकीतून देण्यात आला होता. यानंतर राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सह्याद्री अतिथीगृहावर तातडीने बैठक बोलावली. यावेळी गिरणी कामगारांच्या घरांसाठी बंद गिरण्या अथवा अन्य पर्यायांचा विचार व्हावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अधिकाऱ्यांना दिले. यामुळे आता गिरणी कामगार घरांच्या प्रश्नाबाबत राष्ट्रीय मिल मजदूर संघाने वेळोवेळी घेतलेल्या ठोस भूमिकेची दखल शासनाने घेतली आहे. या बैठकीला म्हाडाचे वरिष्ठ अधिकारी, माजी मंत्री रामदास कदम, गृहनिर्माण विभागाच्या अपर मुख्य सचिव वल्सा नायर, तसेच राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस व कुंभार्लीचे (चिपळूण) सुपुत्र गोविंदराव मोहिते आणि अन्य युनियनचे पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत गिरणी कामगार कृती संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी शेलू येथील घरांचा प्रश्न लावून धरला. मात्र, शेलू-वांगणी येथील घर नाकारल्यास कामगाराचा घराचा हक्क राहाणार नाही असे सरकारच्या अध्यादेशात (कलम 17) नमूद आहे. मात्र, याला राष्ट्रीय मिल मजदूर संघाचा विरोध आहे. तसेच उद्या कामगारांनी शेलू येथील घर नाकारले तर कामगारांना घर मिळणारच नाही. त्यांचा मुंबईत मिळणाऱ्या घरांवर देखील हक्क राहणार नाही, ही गोष्ट लक्षात घेता गिरणी कामगार कृती संघटनेच्या नेत्यांचे या बैठकीतील वरील कृत्य कामगारांच्या हिताला साजेसे नाही, असे रामिम संघाचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी म्हटले आहे. यानंतर मुंबई महानगर प्रदेशात देखील घरे उपलब्ध करून देण्यास शासन प्रयत्नशील आहे, असे सांगून ना. शिंदे यांनी अध्यादेशातील जाचक कलम 17 रद्द करण्याचे महत्त्वपूर्ण आश्वासन दिले आहे. बैठकीत राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्यावतीने सविस्तर मागण्यांचे निवेदन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले. गिरणी कामगारांना मुंबईतच घरे मिळावीत यासाठी सरकारने न्यू ग्रेट आणि स्प्रिंग मिल मध्ये तयार असलेल्या घरांची सोडत त्वरित काढावी, इंडिया युनायटेड मिल क्रमांक 4 सह, सिताराम, मधुसूदन, कोहिनूर 1 व 2 या सहा गिरण्यांची जमीन अविलंब ताब्यात घ्यावी आदी मागण्यांसह एस.आर.ए. तसेच पंतप्रधान आवास योजनेतील घरे अटी शिथिल करून देण्यात यावीत, वरळी व नायगाव येथील बीडीडी चाळ पुनर्विकासातील जास्तीची घरे गिरणी कामगारांना मिळावीत आदी मागण्या निवेदनात करण्यात येऊन गिरणी कामगार घरांसाठी पर्याय सूचित करण्यात आले आहेत. मात्र त्या साठी सरकारची मानसिकता असली पाहिजे, असे रामिम संघाचे अध्यक्ष व आमदार सचिन अहिर, सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी म्हटले आहे.



# चिपळूणमधील नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी साहित्य आणि धनादेश वाटप

### सर्वसामान्यांच्या योजनेसाठी कुणी पैसे मागत असेल त्याच्यावर पोलीस कारवाई

**पालकमंत्री डॉ. उदय सामंत**
**दैनिक युवक आधार**

**चिपळूण (प्रतिनिधी)--** : कामगार विभागाची योजना ही सर्वसामान्यांसाठी आहे. महिलांसाठी आहे. अशा योजनांचा लाभ देण्यासाठी कुणी पैसे मागत असेल, तर नावासह तक्रार करावी. अशा प्रवृत्तीवर पोलीस कारवाई केली जाईल. त्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन पालकमंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले. चिपळूण येथील इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृहात कामगार आयुक्त कार्यालयामार्फत चिपळूण तालुक्यातील नोंदीत बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच, सुरक्षा संच व गृहपयोगी साहित्य वाटपाचा कार्यक्रम पालकमंत्र्यांच्या हस्ते आज झाला. यावेळी तहसिलदार प्रवीण लोकरे, सहायक कामगार आयुक्त संदेश आयरे, नगरपालिका मुख्याधिकारी विशाल भोसले, प्रकाश देशपांडे, बाबू म्हाप, सचिन कदम, अशोक शिंदे आदी उपस्थित होते. पालकमंत्री डॉ.सामंत म्हणाले, आमच्या सगळ्यांचा डोलारा कामगारांमुळे उभा आहे.




म्हणून चिपळूणमध्ये दुसऱ्यांदा आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास मी उपस्थित आहे. या योजनेचे अर्ज भरुन देण्यासाठी पाचशे रुपये, कीट देण्यासाठी दीड हजार रुपयाची मागणी होत असल्याची तक्रार प्राप्त झाली होती. अशांची नावासह तक्रार केल्यास शंभर टक्के पोलीस कारवाई केली जाईल. त्यासाठी पुढाकार घ्यावा. ही योजना सुखामध्येही आणि दुःखामध्येही उपयुक्त आहे. अपघातात जखमी, मृत्यू झाल्यास कुटूंबास मदत देणारी आहे. दहा हजारापासून पन्नास हजारापर्यंत कामगारांची नोंदणी करण्यापर्यंत गेलो आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही. आपल्यासाठी असणाऱ्या योजना समजून घेतल्या पाहिजेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या मुलांना अमेरिकेला पाठविण्याची राज्यात सर्वप्रथम रत्नागिरी जिल्ह्याने योजना सुरु केली. जिल्ह्यातील एक लाख महिलांना कॅन्सर होवू नये म्हणून, लस देण्याचा निर्णय घेण्यात आला. या डोसमुळे 92 टक्के महिलांना कॅन्सरचा धोका टळल्याचे डब्ल्यूएचओने सांगितले आहे. त्यासाठी 9 ते 14 वयोगटातील 50 हजार मुलींना देण्यात येणाऱ्या डोससाठी 6 कोटींची तरतूद करण्यात आलेली आहे. महिलांच्या कल्याणाची योजना सगळ्यांनी उचलून धरली पाहिजे. अंमली पदार्थापासून पुढची पिढी वाचविण्याचे काम आपल्या सर्वांना करावयाचे आहे असे सांगून पालकमंत्री डॉ.सामंत म्हणाले, अंमली पदार्थ विरोधात कुणीही कोणतीही तडजोड करु नये त्याबाबत कारवाई झालीच पाहिजे. नव्वद दिवसांचे मिशन राबवून अंमली पदार्थांच्या विक्रेत्याचे मूळ ठेचले पाहिजे. यावेळी लाभार्थ्यांना विविध योजनांचे धनादेश वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करण्यात आला तसेच दीपप्रज्वलन करण्यात आले. सहायक कामगार आयुक्त श्री. आयरे यांनी स्वागत, प्रास्ताविक करुन कामगार विभगाच्या विविध योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाला नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिळफाटा येथील रस्ता रुंदीकरणासाठी "आप"ने पुकारले उपोषणाचे हत्यार

### 15 मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर बसणार उपोषणाला : डॉ पठाण

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

खोपोली शिळफाटा येथील आरे डेरी ते गाझी बाबा दर्गा पर्यंत मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 48 अतिशय अरुंद असल्याकारणाने खूप जास्त प्रमाणात अपघात होत असतात व दररोज वाहतूक कोंडी होत असते त्यामुळे तेथील रहिवाशांना व दुकानदारांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. आम आदमी पार्टी तर्फे सदर रस्ता रुंदीकरणासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याबरोबर वारंवार बैठका व पत्र व्यवहार करून सुद्धा सदर रस्ता रुंदीकरणाचे काम अद्यापही सुरू झालेले नाही. सदर रस्ता लवकरात लवकर रुंदीकरण व्हावा व प्रशासनाचे लक्ष वेधण्याकरिता आम आदमी पार्टी खोपोली शहर अध्यक्ष ग्यासुद्दीन खान, खोपोली शहर उपाध्यक्ष विवेक वाघमारे, खोपोली शहर सचिव चंद्रप्रकाश उपाध्याय व इतर पदाधिकारी गुरुवार दिनांक 15 मे 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता खोपोली शिळफाटा येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकासमोर एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करणार आहोत व सदर रस्ता लवकरात लवकर रुंदीकरण सुरू न झाल्यास आमरण उपोषण करू असे डॉ. पठाण यांनी सांगितले.



द•ख•ल

## भोर तालुक्याचा १२ वीचा निकाल ८९.१३ टक्के

**भोर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रु.२०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेचा ऑनलाइन निकाल आज (दि.५)जाहीर करण्यात आला. तालुक्याचा निकाल ८९ .१३ टक्के लागला असून तालुक्यातील एकूण १६ कनिष्ठ महाविद्यालया पैकी ३ कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला.एकूण ४ व्यवसाय अभ्यासक्रम शाखा असलेल्या एका कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल शंभर टक्के लागला आहे.तालुक्यातील एकूण १५ कनिष्ठ महाविद्यालयातील १हजार ९७० विद्यार्थी परीक्षेस बसले होते पैकी १ हजार ७५६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.उच्चतम श्रेणीत ५१ विद्यार्थी ,प्रथम श्रेणीत ३५४ ,द्वितीय श्रेणीत १ हजार ४९ तर पास श्रेणीत ३०२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.गतवर्षीच्या तुलनेने यंदा निकाल ५.३ टक्के कमी लागला आहे.

## आंबेगाव तालुक्याचा बारावीचा निकाल ९५.६६ टक्के

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्याचा या वर्षीचा बारावीचा निकाल ९५.६६ टक्के लागला आहे. यावर्षी तिन्ही कला वाणिज्य विज्ञान या तिन्ही शाखा मिळून २३८९ विद्यार्थी पैकी २३७४ विद्यार्थी परीक्षेत बसले होते. त्यातील २२७१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असुन आंबेगाव तालुक्यातील एकून निकाल ९५.६६ टक्के लागला आहे. आंबेगाव तालुक्यातील श्री शिवाजी विद्यालय धामणी, हुतात्मा बाबू गेनू विद्यालय महाळुंगे पडवळ, श्री पंढरीनाथ विद्यालय पोखरी, शासकीय आश्रम शाळा गोहे बुद्रुक, विद्या विकास मंदीर विद्यालय अवसरी बुद्रुक, श्री भैरवनाथ विद्यालय शिंगवे, डेक्कन मराठा विद्यालय लांडेवाडी या विद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला असून सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

## लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील जयंतीनिमित्त सायकल वाटप

**प्रवरानगर :** लोकनेते डॉ बाळासाहेब विखे पाटील यांच्या ९३ व्या जयंती निमित्त डॉ विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशन संचलित प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र, अहिल्यानगर अंतर्गत ४१ दिव्यांग व वयोवृद्ध व्यक्तींना सहायक साधनांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ . पी एम गायकवाड, महासंचालक ( प्रशासकीय), डॉ . अभिजित दिवटे, संचालक, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र , अहिल्यानगर ,डॉ. पडळकर , मुख्य प्रशासकीय




अधिकारी , डॉ. दीपक अनाप , समन्वयक , जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व इतर अधिकारी उपस्थित होते. डॉ सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नातून डॉ विखे पाटील फौंडेशन, अहिल्यानगर येथे सुरु झालेल्या प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र अंतर्गत दररोज पात्र वयोवृद्ध ( ६० वर्षावरील ) व दिव्यांग व्यक्तींना सहायक साधनाचे वाटप करण्यात येणार आहे. भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम व सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय , भारत सरकार यांच्या अंतर्गत सुरु झालेले हे भारतातील ७१ वे व महाराष्ट्रातील ४ थे केंद्र आहे.

# आळंदीतील ज्ञानभूमीसाठी महाराष्ट्र शासनाकडे वकिली करणार : मंत्री सामंत



**आळंदी :** आळंदी देवस्थानच्या मालकीच्या गायरान जमीनीत वारकरी केंद्रित बहु ऊद्देशीय ज्ञानभुमी या नियोजित प्रकल्प लवकर मार्गी लागण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे तुमच्या वतीने वकीली करणार असल्याचे आश्वासन मराठी भाषा व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले. संत ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर जन्मोत्सवानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सोहळयाला भेट देण्यासाठी मराठी भाषा व उद्योगमंत्री उदय सामंत आले होते त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मा.आ.विलास लांडे, प्रमुख विश्वस्त योगी निरंजननाथ, पालखी सोहळाप्रमुख डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप, हभप चैतन्य महाराज कबीर, हभप पुरुषोत्तम महाराज पाटील, ॲड. रोहिणी पवार, नारायण महाराज जाधव, भागवत महाराज शिरवळकर, धर्मवीर आध्यात्मिक सेनेचे अध्यक्ष अक्षय महाराज भोसले, भगवान पोखरकर, डि.डि.भोसले पाटील, नंदकुमार कुऱ्हाडे, शिवसेना शहरप्रमुख राहुल चव्हाण, व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर उपस्थित होते. यावेळी मंत्री सामंत म्हणाले की मराठी भाषा अनुभवयाची असेल तर ज्ञानेश्वरी अभ्यासने आवश्यक आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवण्यासाठी जो प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवला त्यावेळी मी मराठी भाषेचा राज्यमंत्री होतो आणि आता कॅबिनेट मंत्री असतना मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा जीआर आणायचे भाग्य सुध्दा मला मिळाले हे सर्व माऊलींच्या आशीर्वादाने मिळाले आहे. आपली मराठी भाषा ज्ञानेश्वर माऊलींपासून सुरु झाली आहे. ज्ञानेश्वरांची भाषा सुद्धा मराठी आहे हे सर्व पुरावे सादर केल्यावर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. पुढील वर्षी माऊलींच्या जन्मोत्सवाला ७५१ वर्ष होत असून त्याअनुषंगाने ज्ञानेश्वरी च्या छपाई साठी आळंदी देवस्थानला एक कोटी निधी यावेळी जाहीर करत आहे. तसेच ७५१ व्या माऊलींच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधुन पुढील वर्षी प्रत्येक जिल्ह्यात तुमच्या सर्वांच्या सहकार्याने व मराठी भाषा मंत्रालयाच्या माध्यमातून किर्तन महोत्सवाचे आयोजन करु असा मानस सामंत यांनी व्यक्त केला आहे.

## गहिनीनाथ गैबीपीर बाबांच्या यात्रेची कुस्तीच्या जंगी आखाड्याने सांगता


**नेवासा फाटा -** नेवासा तालुक्यातील माळीचिंचोरा येथील गहिनीनाथ गैबीपीर बाबांच्या यात्रा उत्सवाची जंगी कुस्त्यांच्या आखाड्याने सांगता करण्यात आली या आखाड्यात अंतिम कुस्तीच्या विजेत्या पहिलवानास २१ हजार रुपये इनाम देण्यात आला . माळीचिंचोरा येथील हिंदू मुस्लिम तसेच सर्व धर्मीयांचे ग्रामदैवत गहिनीनाथ गैबी पीर बाबाचा यात्रा उत्सवाच ग्रामस्थ तसेच यात्रा कमिटी कडून दरवर्षी भव्य आयोजन केलं जात याहीवर्षी नव्याने अस्तित्वात आलेल्या यात्रा कमिटीच्या वतीने भव्य आयोजन करण्यात आलं होतं यात कावड मिरवणूक छबिना, संदल, हजऱ्या तसेच कुस्तीचा हगामा, तमाशा अशा प्रकारे विविध धार्मिक तसेच मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते येथील असलेली संदल मिरवणूक कावड मिरवणूक छबिना मिरवणूक या सर्व मिरवणुकीत विशेष करून महिलांची गर्दी लक्षणीय असल्याने जवळपास या मिरवणुकीमध्ये पाच ते दहा हजार भाविकांची गर्दी मिरवणुकीसाठी झाली होती नेवासा तालुक्यात गंगेवरून आणलेल्या पाण्याच्या कावडीची सर्वाधिक जास्त संख्या माळीचिंचोरा या गावची असल्याची परंपरा आहे आणि ती परंपरा याही वर्षी ग्रामस्थांनी कायम ठेवली . हा यात्रा उत्सव यशस्वीरित्या पार माजी जिल्हा परिषद सदस्य तुकारामजी शेंडे पोलीस पाटील विठ्ठल शेंडे, ॲड. बापूसाहेब चिंधे, रवींद्र चिंधे, संजय कारभारी पुंड, तुकाराम पुंड, संजय गोरक्षनाथ पुंड यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रा कमिटीचे अध्यक्ष नितीन अहिरे, मयूर शेंडे, अशोक चिंधे, किरण चिंधे, राजकुमार खांदे, राजेंद्र चिंधे, सतीश देव्हारे, कचरू पुंड यांनी परिश्रम घेतले



**पोलीस आणि गावपुढाऱ्यांची भुमिका महत्वाची**

**माळीचिंचोरा येथील यात्रेपूर्वी एक महिना अगोदर देवाच्या समाधीवर चादर टाकण्यावरून दोन गटात हाणामाऱ्या होऊन मोठा वाद झाला होता यावरून पोलीस ठाण्यात गुन्हे देखील दाखल झाले होते. त्यामुळे यावर्षी यात्रेवर वादाच सावट असल्याने ग्रामस्थांसह भाविकांमध्ये भीतीच वातावरण होतं परंतु नेवाशाचे परीविक्षाधिन पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे यांनी यात्रेपूर्वी चार दिवस अगोदर शांतता कमिटीची बैठक घेऊन सलग तीन दिवस गावात ठाण मांडून प्रत्येक हालचालीवर बारीक नजर ठेवून असल्याने तसेच गावातील सर्वच गटातील गाव पुढाऱ्यांनी देखील यात्रेत वाद होऊन गावच्या यात्रेला गालबोट नको म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली त्यामुळे यात्रा शांततेत आणि उत्साहात पार पडली.**

## जनावरे चारणाऱ्या तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू



**राहुरी:** तालुक्यातील डिग्रस येथिल रहीवाशी असलेला २४ वर्षीय अविवाहित तरुण बेपत्ता झाला होता. परंतु काल डिग्रस शिवारातील मुळानदी वरील केटीवेयरच्या पाण्यात पडून मयत झाल्याची घटना दि. ५ मे रोजी उघडकीस आली आहे. सत्यवान रोहीदास भालेराव, वय २४ वर्षे, रा. डिग्रस, ता. राहुरी हा तरुण काल दि. ४ मे रोजी सकाळी जनावरे चारण्यासाठी गेला होता. परंतू तो संध्याकाळी परत घरी न आल्यामुळे त्याच्या घरच्यांनी त्याची शोधाशोध सुरु केली. त्याच्या घरच्यांनी त्याचा सकाळपर्यंत आजूबाजूच्या परिसरात शोध घेतला. त्यावेळी डिग्रस बारागाव नांदूर रस्त्यावरील असलेल्या मुळा नदीवरील केटीवेअर पात्रातील एका डबक्यात सत्यवान याचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली व घटनास्थळी गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती . या घटनेची माहिती मिळताच पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला असून या घटने बाबत राहुरी पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. सत्यवान रोहिदास भालेराव याच्या अपघाती निधनाने परीसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## संत तुकाराम महाराज पालखी उरळी कांचनला घेणार विसावा

**उरुळी कांचन :** अखेर यावर्षी जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळा उरुळी कांचन (ता. हवेली) येथे दुपारच्या विसाव्यासाठी थांबणार ! पालखी सोहळा उरुळी कांचन विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या मोकळ्या जागेत विसाव्यासाठी तब्बल एक तासासाठी थांबणार आहे अशी माहिती उरुळी कांचनचे सरपंच अमित (बाबा) कांचन यांनी दिली. मागील वर्षी पालखी सोहळा उरुळी कांचन ग्रामस्थ, पालखी सोहळा प्रमुख आणि विश्वस्त यांच्यामधील वादाने उरुळी कांचन येथे थांबला नव्हता. या पार्श्वभूमीवर ही बाब सर्व ग्रामस्थ, भाविक, वारकरी आणि एकूणच वारकरी संप्रदायाच्या भावनेशी निगडित होती. त्यामुळे पालखी सोहळा विषयाला थांबणार या बातमीने उरुळी कांचन परिसरात आनंदाचे वातावरण झाले आहे.जगद्गुरु संत श्रेष्ठ संत तुकाराम महाराज पालखी सोहळा नियोजन संदर्भातील बैठक श्रीक्षेत्र देहू येथील विश्वस्त, पालखी सोहळा प्रमुखांच्या उपस्थितीत नुकतीच पार पडली. या बैठकीत पालखी सोहळ्याचे विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख यांच्याशी उरुळी कांचनचे सरपंच अमितबाबा कांचन व ज्येष्ठ नेते के.डी.कांचन यांच्यासह अन्य मान्यवरांची सकारात्मक चर्चा घडून आली व त्यामध्ये मागील वर्षी न झालेला पालखीचा विसावा, यावर्षी घेण्यास मान्यता दिल्याची माहिती या चर्चेतून समोर आली. हा पालखी सोहळा उरुळी कांचन विविध कार्यकारी सेवा सोसायटी च्या मोकळ्या जागेत तब्बल एक तासासाठी विसाव्यासाठी थांबणार असल्याचे पालखी सोहळा प्रमुख यांनी जाहीर केले. यावेळी सरपंच अमित कांचन यांनी संस्थानचे नवनिर्वाचित अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे यांचा उरुळी कांचन ग्रामस्थांच्या वतीने सत्कार केला. यावेळी हवेलीचे ज्येष्ठ नेते के. डी. कांचन, माजी उपसरपंच भाऊसाहेब तुपे, दीपक कांचन, सुरेश कांचन, माऊली तांबे, तुकाराम कांचन, अभिषेक कांचन, सागर पांगारे, नारायण कांचन आदी मान्यवर उपस्थित होते. वारकरी सांप्रदायाच्या वैष्णवांचा हा मेळा गेल्या ३४० वर्षांपासून देहू ते पंढरपूर असा चालवला जातो, तो मार्गस्थ होत असताना वेगवेगळ्या गावातून, वाड्या वस्त्यांतून रस्त्याने जात असतो, या मार्गातील वैष्णवाला तुकाराम महाराजांबरोबर विठ्ठलाच्या दर्शनाचा लाभ घेता येतो. दरम्यान, मागील वर्षी उरुळी कांचन येथे पालखी सोहळा परंपरेनुसार गावातून न्यावा असा आग्रह गावकऱ्यांनी धरला होता पण तत्कालीन पालखी सोहळा प्रमुख यांनी ते न ऐकता आम्ही रस्त्यावर थांबू गावात येणार नाही अशी भूमिका घेतली, त्यामुळे पालखी सोहळा उरुळी कांचन येथे पोहचल्यानंतर ग्रामस्थांनी महामार्गावरच थांबून पालखी सोहळ्याचा नगारा अडविला. दुपारचा विसावा हा परंपरेनुसार ग्रामदैवत काळभैरवनाथ मंदिरात करावा, अशी विनंती पालखी सोहळ्याच्या प्रमुखांना ग्रामस्थांनी केली. पण ती विनंती न ऐकल्याने ग्रामस्थ व पालखी सोहळा विश्वस्त यांच्यामध्ये वाद झाला होता. उरुळी कांचन ग्रामस्थ पालखी गावात नेण्यासाठी आक्रमक होते. तेव्हा महसूल व पोलीस प्रशासन पालखी सोहळ्याच्या बाजूने राहून त्यांनी पालखी सोहळा ठरलेल्या वेळापत्रकानुसार उरुळी कांचन येथील विसाव्याला न थांबता थेट यवतच्या दिशेने मार्गस्थ करत, ग्रामस्थ व पालखी सोहळा प्रमुख यांच्यातील वादामध्ये ६० वर्षाची परंपरा मोडीत काढली होती. दरम्यान, सरपंच अमित कांचन व ग्रामस्थांच्या मध्यस्थीने पुन्हा एकदा पालखीचा विसावा उरुळी कांचन येथे होणार आहे. त्यामुळे अमित कांचन यांचे व पदाधिकाऱ्यांचे परिसरातून कौतुक केले जात आहे.

## ॲड. बानकर यांना राज्यपाल पुरस्कार हा शनीचा प्रसाद : भास्करगिरी महाराज

**सोनई :** महाराष्ट्र दिनी शनिशिंगणापूरचे पोलीस पाटील अँड .सयाराम बानकर यांना महाराष्ट्र शासनाचा पोलीस पाटील उत्कृष्ट सेवा पुरस्कार राज्यपालाच्या वतीने अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला,त्या निमित्ताने श्री क्षेत्र देवगड येथे अँड.सयाराम बानकर यांचा सन्मान हभप. भास्कर गिरीजी महाराज यांच्या हस्ते करण्यात आला तेव्हा मिळालेला हाच पुरस्कार हा शनी महाराजांचा प्रसाद असल्याचे मत श्री.क्षेत्र देवगड संस्थांनचे मठाधिपती भास्करगिरी महाराज यांनी सत्कार प्रसंगी व्यक्त केले. स्व.बानकर भाऊंनी शनि देवाची निस्वार्थी व मनोभावे निस्सीम सेवा केली. वारकरी संप्रदायाची परंपरा बानकर कुटुंबीयांनी सेवा पुढे जोपासावी, या सेवेचा हा प्रसादच आहे. असे हभप भास्करगिरी महाराज यांनी मत व्यक्त केले. यावेळी शनेश्वर देवस्थानचे अध्यक्ष भागवत बानकर, उपाध्यक्ष विकास बानकर विश्वस्त शिवाजी दरंदले, हभप अतुल महाराज आदमाने, शैनेश्र्वर देवस्थानचे माजी उपाध्यक्ष सुरेश बानकर, झापवाडीचे सरपंच शशिकांत वाघ आदी उपस्थित होते.

> **शनिदेवाचा आशीर्वाद व स्व.बाबुराव बानकर भाऊचां पुण्याईचां सन्मान द्रिगुणित आनंद देणारा, व अविस्मरणीय आहे.**
> **अँड. सयाराम बानकर**

## मेंढपाळांची हिरव्या चाऱ्यासाठी वणवण



**पाबळ :** उन्हाळ्याची तीव्रता वाढू लागल्याने मेंढरांच्या चाऱ्याचा प्रश्न आता ऐरणीवर येऊ लागला आहे.शिरूर तालुक्यामध्ये पारनेर तालुक्यातील शेकडो मेंढपाळ वास्तव्यास आहेत. फेब्रुवारीच्या सुरुवातीलाच उन्हाचा कडाका वाढू लागल्याने मेंढपाळांना चाऱ्याचा प्रश्न भेडसावू लागला आहे. शिरूर तालुक्यामध्ये बागायती क्षेत्र मोठ्या प्रमाणात असून, माळरान क्षेत्र फारच कमी आहे. त्यामुळे मेंढपाळ लोकांची चाऱ्यासाठी वणवण वाढली आहे. कुठे बाभळीचा पाला तर कुठे शेवरीचा पाला यावरच मेंढ्यांची गुजराण सध्या होत आहे. शिरूर तालुक्यातील बहुतांशी क्षेत्र ओलिताखाली आली आहे. प्रामुख्याने ऊस, केळी व कांदा ही पिके मोठ्या प्रमाणात घेतली जातात. त्यामुळे रिकामे क्षेत्र फारच कमी आहे. ऊस अगर कांदा या पिकाच्या बांधाच्या कडेला मेंढरं चरताना जर एखाद्या मेंढरू पिकामध्ये गेलं तर शेतकरी आणि मेंढपाळ यांच्यामध्ये वादावादी देखील होताना पाहायला मिळत आहे.

**शेतात मेंढ्या बसवून घेण्याचे प्रमाण अत्यल्प**

दीड महिन्यानंतर कांदा काढणीस सुरुवात झाल्यावर काही प्रमाणात कांद्याची पात चारा म्हणून मेंढरांना उपलब्ध होणार आहे. तोपर्यंत मात्र मेंढपाळांची मोठी तारांबळ होणार आहे. तालुक्यामध्ये फ्लॉवर, कोबी, घना व मेथी या भाजीपाला पिकांचे बाजारभाव पडल्यावर शेतकरी मेंढपाळांना या पिकांमध्ये मेंढरं चारण्यास सोडण्यास सांगतो. त्या बदल्यामध्ये मेंढरं स्वतःच्या शेतामध्ये बसून घेतो. अर्थात याचे प्रमाण खूपच कमी आहे.

**मेंढपाळांना बिबट्याचीदेखील दहशत**

मेंढपाळ मंडळींचा मुक्काम आज या शेतावर, तर उद्या त्या शेतावर होतो आहे. शिरूर तालुक्यामध्ये बिबट्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. ज्या ठिकाणी मेंढरांचा वाडा लावला जातो, त्या ठिकाणी हमखास बिबट्या दररोज येतो. त्यामुळे बिबट्याच्या हल्ल्यामध्ये दररोज कुठे ना कुठे मेंढरू मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडत आहेत. वन खात्याने मेंढपाळ व त्यांच्या कुटुंबीयांसाठी तंबू, बॅटरी आदी साहित्य दिले आहे. यामुळे बिबट्यापासून या लोकांचा बचाव होण्यास मदत होत आहे.

## बारामतीत १११ फटाका बुलेट सायलेन्सरवर चढला वाहतूक पोलिसांचा बुलडोझर, लाखोंचा दंडही वसूल

**बारामती :**शहर शांत, सुंदर आणि कायम सुरक्षित राहावं या उद्देशाने बारामती वाहतूक शाखेने अखेर शहरात ध्वनीप्रदूषणाचा कहर करणाऱ्या 'फटाका सायलेंसर'वाल्या बुलेटस्वारांवर कडक कारवाईचा बडगा उगारला आहे. वारंवार सूचना, दंडात्मक कारवाया याला केराची टोपली दाखवणाऱ्या टवाळखोरांना चाप लावत आतापर्यंत तब्बल ५८ बुलेट गाड्यांचे फटाका सायलेंसर जागेवरच काढून बुलडोझर चढवला आहे. या मोहिमेमुळे शहरातील गल्लीपासून मुख्य रस्त्यांपर्यंत 'धडधड' करणाऱ्या बुलेटस्वारांना चांगलाच दणका बसला आहे.ही विशेष मोहीम उपक्रमशील पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत आहे. गेल्या वर्षभरात ५६ कारवाया करण्यात आल्या होत्या, तर




यावर्षी सुरुवातीपासूनच पोलिसांनी गती वाढवत ५८ कारवाया करत ध्वनीप्रदूषण करणाऱ्यांना एकूण १११ चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. एकूण ५८ बुलेटस्वारांचे सायलेन्सर वर बुलडोजर कारवाई करण्यात आली आहे. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी राठोड, वाहतूक पोलीस निरीक्षक यादव आणि पोलीस जवान उपस्थित होते.फॅशन, स्टाईल आणि अटेंशन मिळवण्यासाठी अनेक तरुण मूळ बुलेट गाड्यांमध्ये बेकायदेशीर बदल करून 'फटाका सायलेंसर' लावतात. हे सायलेंसर इतका मोठा आवाज करतात की लहान मूल रडू लागतं, वृद्धांचा थरकाप उडतो, आणि आजारी रुग्णांची झोप उडते. महाविद्यालय परिसर, हॉस्पिटलजवळ, सिग्नलच्या रांगेत या गाड्यांचा आवाज म्हणजे एक 'ध्वनी दहशत' बनली होती. पोलिसांनी अनेक वेळा सूचनाही केल्या, पण कायद्याचा धाक राहिलेला नाही हे पाहून मोटार वाहन कायद्यातील कलम १९८ अंतर्गत थेट कारवाईचा निर्णय घेतला. वाहतूक पोलिसांच्या या मोहिमेचे सर्व स्तरांतून मोठे कौतुक होत आहे. सोशल मीडियावरही नागरिकांकडून समाधान व्यक्त होताना दिसत आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस उपनिरीक्षक सुभाष काळे, पोलीस जवान प्रदीप काळे, रूपाली जमदाडे, सुधाकर जाधव ,प्रशांत चव्हाण, अशोक झगडे, रेश्मा काळे, सीमा घुले, स्वाती काजळे, माया निगडे, सीमा साबळे ,अजिंक्य कदम आणि गृह रक्षक दलाचे जवान अमन मंडले, रोहित शिंदे, अभिषेक टेके यांनी केली..

> **''कायदा हा आपल्या संरक्षणासाठी आहे. शहर शांत ठेवायचं असेल तर कायदा पाळणं गरजेचं आहे.जो कायदा मोडेल त्यावर कारवाई निश्चित आहे'' सुदर्शन राठोड**

## चारचाकी वाहनांसाठी 'एमएच ४२ बीएस' क्रमांकाची नवीन मालिका




**बारामती :** खाजगी संवर्गातील चारचाकी वाहनांसाठी बारामती उप प्रादेशिक परिवहन कार्यालय येथे 'एमएच ४२ बीएस' क्रमांकाची नवीन मालिका सुरु करण्यात येणार असून आकर्षक क्रमांक राखून ठेवण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ज्या खाजगी चारचाकी वाहनांसाठी आकर्षक तसेच पसंतीचा क्रमांक हवा असेल त्यांनी ७ मे रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ३ वाजेच्यादरम्यान धनाकर्षासह (डी. डी.) विहित नमुन्यात अर्ज करावा. एकाच क्रमांकाकरीता एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्यांची यादी ७ मे रोजी सायं ५ वाजता कार्यालयीन सूचना फलकावर लावण्यात येईल. यादीतील अर्जदारांना लिलावासाठी जास्त रकमेचा डी.डी. जमा करावयाचा असेल त्यांनी ८ मे रोजी दुपारी ३.३० वाजेपर्यत सीलबंद पाकिटात कार्यालयात जमा करावा. त्याच दिवशी दुपारी ४.३० वाजता संबंधित अर्जदारांसमोर लिफाफे उघडून विनिर्दिष्ट शुल्कापेक्षा जास्तीत जास्त रक्कमेचा धनाकर्ष भरलेल्या व्यक्तीस नमूद पसंती क्रमांक वितरीत केला जाणार आहे.

अर्जासोबत पत्त्याचा पुरावा, छायाचित्र ओळखपत्र तसेच पॅनकार्डची स्वाक्षांकित प्रत आणि 'डीवाय. आर.टी.ओ., बारामती'या नावाने राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेचा बारामती येथील धनाकर्ष असावा. एकदा राखून ठेवलेला नोंदणी क्रमांक बदलून देता येणार नाही. नोंदणी क्रमांक राखीव ठेवण्यासाठी प्रदान केलेले शुल्क परत करता येणार नसल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सुरेंद्र निकम यानी कळविले आहे

द•ख•ल

## मिसगर ज्युनिअर कॉलेजचा सायन्स व आर्टसचा निकाल ७५ टक्के

**अहिल्यानगर** – नागोरी मुस्लिम मिसगर जामत ट्रस्टच्या मिसगर जुनियर कॉलेज चा आट्र्सचा व सायेंन्सचा ८५ टक्के लागला. आट्र्स मध्ये प्रथम बागवान रेहान इकबाल,द्वितीय तंबोली सानिया मंजूर तृतीय देसाई सना हुसेनसाब तर सायन्स मध्ये प्रथम शेख मुशफीरा अंन्सार, द्वितीय शेख मिसबाह अंजुम अ. मजीद, तृतीय खान सबीया रियाजुद्दीन हे उत्तीर्ण झाले आहे. सर्व यशस्वि विधार्थांना मिसगर ट्रस्ट व बोर्ड ऑफ ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष युनुस सुलतान तांबटकर, सचिव इमरान शफी अहमद शेख, खजींदार इमरान जमीर खान विश्वस्त फरहान खालीद खान व नविद तांबटकर इतर बोर्ड ऑफ ट्रस्टीजनी शुभेच्छा दिल्या.

## शिरसगाव-ब्राह्मणगाव रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे

**श्रीरामपूरः**- शिरसगाव ग्रामपंचायत हद्दीत शिरसगाव ब्राह्मणगाव रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून सार्वजनिक निधीचा योग्य वापर न होता सर्व नियम पायदळी तुडवले जात असून ते काम तातडीने बंद करून कामाच्या गुणवत्ता नियंत्रणासाठी तज्ञ अभियंत्यांची समिती नेमून ठेकेदारावर कडक कारवाईची मागणी



राष्ट्रीय श्रीराम संघाचे शिरसगाव शाखेचे अध्यक्ष रोहित यादव यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे केली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत शिरसगाव ब्राह्मणगाव रस्त्याचे काम सध्या चालू आहे.श्रीरामपूर तालुक्यातील दोन महत्त्वाच्या गावांना जोडणारा हा रस्ता असून या रस्त्यावर नेहमी वर्दळ असते हाच रस्ता पुढे वैजापूर या हमरस्त्याला जोडलेला आहे.सध्या चालू असलेले रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट प्रतीचे चालू असल्याचे रोहित यादव यांनी आपल्या तक्रार अर्जात म्हटले आहे.

आपल्या तक्रारीत त्यांनी म्हंटले आहे की, रस्त्याला योग्य तो सपाटी देण्यात आलेली नाही,डांबरीकरण अपूर्ण असून अनेक ठिकाणी खड्डे राहिलेले आहे,कामासाठी वापरण्यात आलेली सामग्री ही निकृष्ट प्रतीची असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे,काम करतांना कोणत्याही मानक प्रक्रिया व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केल्याचे दिसून येत नाही तसेच सार्वजनिक निधीचा योग्य वापर न होता काम पुन्हा खराब स्थितीत येण्याची भीतीही यादव यांनी तक्रारीत व्यक्त केली आहे.

रोहित यादव यांनी कार्यकारी अभियंत्यांकडे केलेल्या तक्रारीत सदर कामाची तज्ञ अभियंत्यांची समिती स्थापून तपासणी करण्याची मागणी करत भविष्यात या रस्त्याने प्रवास करणाऱ्या नागरिकांना अपघाताचा धोका होऊ शकतो अशी भीतीही त्यांनी आपल्या तक्रारीत व्यक्त केली आहे.

# कृषी योजनांकडे शासनाचे दुर्लक्ष, शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप

**लिंपणगाव :**राज्य सरकारकडून राज्यातील शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानात राज्य सरकारने पूर्णतः दुर्लक्ष केल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठी संभ्रमावस्था निर्माण झाली असून; त्यामध्ये कृषी योजनेअंतर्गत असणाऱ्या यांत्रिकीकरण; ट्रॅक्टर अवजारे; कांदा चाळ; ठिबक सिंचन; शेततळे इत्यादी योजना सध्यातरी ठप्प झाले आहेत. शेतकऱ्यांचे म्हणण्यानुसार गेल्या अनेक महिन्यापासून या कृषी अनुदान संदर्भात शासनाची भूमिका मात्र गुलदस्तात दिसून येत आहे. शेतकऱ्यांनी शेतीसाठी लागणारे अवजारे कांदा चाळ; ठिबक सिंचन; शेततळे इत्यादी ऑनलाइन अर्ज दाखल केले. परंतु अद्याप पर्यंत या अनुदानाची सोडत पद्धतीने कार्यवाही होत नसल्याने शेतकरी चिंतातुर आहेत. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार जगाचा पोशिंदा म्हणून आज सर्वजण शेतकऱ्यांकडे पाहत आहेत. ज्यावेळी शेतकरी संकटात आहे त्यावेळी मात्र राज्यकर्ते शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे पाठ फिरवतात ही मोठी शोकांतिका आहे. शेतकऱ्यांनी कष्ट करून पिकवलेला माल आज कवडीमोल किमतीमध्ये शेतकऱ्यांना बाजारात विकावा लागतो. त्यामध्ये कमी पाण्यावर अधिक उत्पन्न काढण्याचा शेतकऱ्यांचा कल सध्या दिसून येत आहे. दिवसेंदिवस पावसाचे कमी जास्त प्रमाण पर्यावरणाचा समतोल देखील ढासळला जातोय. अशा परिस्थितीत शेतकरी आपले जीवन जगताना दिसून येत आहेत. शासनाने कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना यापूर्वी अनेक ऑनलाईन योजना जाहीर केल्या सोडत पद्धतीने शेतकऱ्यांना विविध योजना मिळत होत्या. परंतु सद्यस्थितीला कृषी योजनांकडून कोणत्याही प्रकारची ऑनलाइन नोंदणी करूनही मिळत नाही. सेतू केंद्रामध्ये देखील शेतकरी वारंवार कृषी योजना विषयी माहिती घेऊन ऑनलाईन योजनांसाठी अर्ज दाखल करत आहेत. परंतु शासनाची भूमिका अद्यापही सकारात्मक दिसून येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमावस्था सध्या तरी दिसून येत आहे.

एकीकडे शेतकरी कमी पाण्यावर अधिक उत्पन्न घेण्याचा प्रयत्न करत आहेत. कृषी विभागाकडून देखील शेतकऱ्यांना मार्गदर्शन यापूर्वी होत होते. परंतु शासन स्तरावरून कृषी योजनांना सध्या तरी ब्रेक बसल्याने अनुदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांची मात्र घोर निराशा होताना दिसत आहे. सद्यस्थितीला कांद्याचे भाव कोसळले कांद्याच्या लागवडीपासून कांदा सुरक्षित ठेवण्यापर्यंत शेतकऱ्यांची मात्र दररोज मोठी कसरत होताना दिसत आहे. त्यामध्ये कवडीमोल कांद्याला भाव असल्याने कोणताच खर्च शेतकऱ्यांच्या पदरी पडत नाही. कांद्याला भाव नसल्यामुळे शेतकऱ्यांनी कांदा वखारीमध्ये ठेवण्यासाठी धडपड सुरू केलेले आहे. वखारीचा खर्च देखील सध्या शेतकऱ्यांना सोसावा लागत आहे. शासनाकडून कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांना विविध योजना जाहीर होत होत्या परंतु अलीकडे कृषी विभागाकडे शासनाने पूर्णतः पाठ फिरवल्यामुळे ऑनलाइन केलेल्या अर्जाचा देखील भुर्दंड शेतकऱ्यांच्या माथी पडत आहे. यासंदर्भात श्रीगोंद्याचे कृषी अधिकारी श्री गांगर्डे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की; शासन कृषी योजनांच्या धोरणामध्ये बदल करण्याचा निर्णय घेताना दिसून येत असून रेण्डम पद्धतीने निवड करण्याची मोहीम कृषी विभागामार्फत राबवण्याचे धोरण देखील शासनाच्या विचाराधीन असून; अर्ज दाखल झाल्यानंतर त्याची तात्काळ सोडत होणार आहे. असे कृषी अधिकारी गांगर्डे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

शेतकऱ्यांचे मात्र वास्तव चित्र अत्यंत गंभीर आहे. एकीकडे कांद्याला भाव नाही. कांद्याला भाव मिळेल या अपेक्षेवर शेतकऱ्यांनी गावोगावी स्वखर्चाने वखारी तयार करून त्यामध्ये कांदा सुरक्षित ठेवण्यासाठी रात्रंदिवस धावपळ केल्याचे दिसते. शासन स्तरावरून मात्र कृषी योजनांची कुठल्याही प्रकारची कार्यवाही व अंमलबजावणी होत नसल्याने शेतकरी सध्या चिंतातूर असल्याचे दिसून येत आहे. शासनाने अशा या प्रतिकूल परिस्थितीत कृषी योजनांची ऑनलाईन पद्धतीने नोंद घेऊन मागणीप्रमाणे शेतकऱ्यांना तात्काळ कृषी योजनांचा लाभ देण्यात यावा; अशी मागणी शेतकऱ्यांमधून मोठ्या प्रमाणात होत आहे.

## जीवे मारण्याच्या प्रयत्नात फिर्यादीच्या कुटुंबियांवर पुन्हा प्राणघातक हल्ला

**अहिल्यानगरः**जीवे मारण्याच्या प्रयत्नात प्राणघातक हल्ला करणाऱ्या आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी फिर्यादी शांता अमोल बोचरे व त्यांच्या कुटुंबीयांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वरे केली आहे. तर, सदर आरोपींकडून वारंवार हल्ले होत असल्याने कुटुंबीयांना धोका निर्माण झाला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शांता बोचरे यांच्या फिर्यादीवरून, १७ एप्रिल रोजी नगर तालुका पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला होता. संबंधित आरोपी व इतर आठ ते दहा इसमांनी जबर मारहाण करत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. या घटनेनंतरही आरोपींवर ठोस कारवाई झाली नाही. पुन्हा एकदा, बोचरे दांम्पत्य गाडीवरून जात असताना आरोपींनी गाडी अडवली आणि कोयत्यासह आठ ते दहा इसमांनी हल्ला चढवला. या हल्ल्यात शांता बोचरे यांच्या गळ्यातील तीन तोळ्यांचे सोन्याचे गंठण हिसकावून घेण्यात आले. पतीवर लोखंडी गज, लाकडी काठ्या व कोयत्याने वार करून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. पती गंभीर जखमी झाले असून, सुदैवाने ते थोडक्यात बचावले.पोलीस प्रशासन आरोपींवर कठोर कारवाई न करत असल्यामुळे त्यांचा जीव धोक्यात आला आहे. त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन देत, या गुंड प्रवृत्तीच्या आरोपींवर तात्काळ आणि कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. गुन्हेगार मोकाट असल्याने संपूर्ण कुटुंबीयांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## राजघाट येथून निघालेल्या सद्‌भावना ज्योतीचे स्नेहालयात आज आगमन

**अहिल्यानगरः**राजघाट येथून निघालेल्या सद्भावना ज्योतीचे स्नेहालय पुनर्वसन संकुल येथे ,मंगळवार दिनांक ६ मे रोजी सायंकाळी ५:३० वाजता स्वागत केले जाणार आहे.

विश्वमित्र योगेशभाई माथूरिया या उपक्रमाचे नेतृत्व करीत आहेत. जगातील सर्व खंडातील ५० हून अधिक देशात बुद्ध, गांधी, नेल्सन मंडेला ,भगवान महावीर आदी महापुरुषांचे आणि प्रेषितांचे विचार जनसामान्यात पोहोचविण्यासाठी योगेश भाई यांनी सातत्याने पदयात्रा काढून प्रबोधन केले आहे. दिल्लीतील राजघाटावर महात्मा गांधी यांची समाधी आहे. येथे एक अखंड प्रेरणा ज्योत तेवत असते. हा अग्नी आपल्या लामण दिव्यात प्रज्वलित करून योगेश भाईनी राजघाट येथून आपल्या सहकाऱ्यांसह सद्भावना ज्योती यात्रेला प्रारंभ केला. योगेश भाईनी स्थापन केलेल्या रवी कुसुम आश्रमात (तालुका पुरंदर ,जिल्हा पुणे येथील ) शांती – सदभावनेची आणि अहिंसेची ज्योत याच ज्योतीने प्रज्वलित केली जाणार आहे. ही ज्योत घेऊन उद्या सायंकाळी योगेश भाई स्नेहालय पुनर्वसन संकुलात येत आहेत. सायंकाळी ६ ते ६.३० या वेळेत स्नेहालय पुनर्वसन संकुल येथील रवींद्रनाथ टागोर सभागृहात ज्योतीचे स्वागत आणि शांती सदभावनेची प्रार्थना विविध सामाजिक संस्थांतर्फे आयोजिण्यात आली आहे. दिनांक ९ मे रोजी रवी कुसुम आश्रम ,तालुका पुरंदर ,जिल्हा पुणे येथे प्रख्यात सामाजिक कार्यकर्ते जयेश भाई पटेल, सुधीर भाई गोयल आणि अजय पांडे यांच्या उपस्थितीत या प्रेरणा ज्योतीचे स्थायी स्वरूपातील प्रज्वलन होणार आहे...

# पाण्याअभावी श्रीगोंदा तालुक्यातील फळबागा जळाल्या, शेतकरी हवालदिल

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्याला गेल्या अनेक वर्षांपासून या भागात कुकडीची तीन ते चार आवर्तने सुटायची त्यानुसार शेतकऱ्यांनी शेतातील फळबागांचे लागवड केली होती . तालुक्यात मोठ्या प्रमाणात फळबागांची लागवड केली आहे .मात्र पाणी अभावी फळबागा जळू लागल्या आहेत. त्यामुळे शेतकरी हतबल झाली आहेत . त्यामुळे शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. मशागतीसाठी केलेला खर्च निघाला नसल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. कुकडीचे पाणी वेळेत न आल्याने अनेक वर्षांपासून फळबागा जपलेल्या जळून चालल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांचा ऊस करपून गेला आहे. तर पाण्याअभावी कलिंगड अर्ध्यावर सोडून द्यावे लागले



असल्याचे चित्र तालुक्यात दिसत आहे. दरम्यान शेतकऱ्यांचे हाल होत असताना दुसरीकडे लोकप्रतिनिधींकडून काही उपाययोजना केल्या जात नसल्याने बळीराजा हतबल झाला आहे. श्रीगोंदा तालुक्याला पूर्ण आवर्तन न मिळाल्यामुळे तालुक्यातील फळबागा जळून चालले आहेत. अनेक शेतकऱ्यांनी शेकडो एकरावर मोठ्या प्रमाणात फळबागांची लागवड केली आहे. पण सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पाण्याची भीषण टंचाई भासत असून पाण्याअभावी तालुक्यातील फळबागा जळू लागल्या असून या बागा जगविणे शेतकऱ्यांसाठी मोठी आव्हान आहे. यावर्षी दमदार पाऊसच झाला नसल्याने विहिरींनी तळ गाठला आहे परिसरातील ओढे नाले तलाव कोरडे पडले असून पिण्याच्या पाण्यासाठी तालुक्यातील काही गावामध्ये ग्रामस्थांना टँकरची वाट पाहावी लागत आहे. शेतकऱ्यांना फळबागा जगवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. मोठ्या कष्टाने लागवड केलेल्या बागेसाठी पाणी आणायचे कुठून असा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे पण पाणी नसल्यामुळे पोटच्या मुलाप्रमाणे जपलेल्या बागां जळून जात असल्याचे विदारक चित्र श्रीगोंदा तालुक्यात दिसत आहे. सध्या पाच हजार लिटरच्या लहान टँकर साठी २ ते ३ हजार रुपये शेतकऱ्यांना मोजावे लागत असून या पाण्यावर कशी तरी २००-३०० झाडे जगवता येत आहेत .सध्या तीव्र उन्हाळा जाणवत असून पाणी कमी पडत असल्याचे पाच ते सहा दिवसांनी पुन्हा पाणी द्यावे लागत असल्याने शेतकऱ्यांच्या खर्चात मोठी वाढ झाली आहे .फळबागा जगण्यासाठी पाणी विकत घेताना तारेवरची कसरत करावी लागत असल्याने बागा जगवणे अवघड झाले आहे .

**कशी करावी शेती ,पाणी मिळत नाही, मशागतीचा खर्चही निघत नाही ,कुकडीचे आवर्तन वेळेवर सोडत नाहीत, सध्या पाणी नसल्याने फळबागा जळू लागल्या आहेत. फळबागा जगविण्यासाठी २ ते ३ हजार रुपये टँकरला मोजावे लागत आहेत. आता बँकेची कर्ज फेडायची कसे ? चिंता तालुक्यातील शेतकऱ्यांना भेडसावत आहे सध्या भीषण पाणी टंचाई भासत असून विकत पाणी घेऊन फळबागा जगवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे .बागा जगविण्यासाठी शासनाने मदत करावी. कुकडी कॅनल चे आवर्तन सोडावे अशी मागणी शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे. – शेतकरी परसराम ननवरे, बाळू चव्हाण , चंद्रसेन बोराटे, सतीश पाडळे, संभाजी पाचपुते**

## प्रगत विद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ८३ .३३ टक्के

**अहिल्यानगर** - प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता बारावी विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर वाणिज्य शाखेचा निकाल ८३ .३३टक्के लागला.

दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून विद्यालयामध्ये प्रथम क्रमांकाने चेन्नेकर श्रेयस संतोष व कराळे तनवी अशोक ७५.८३द्वितीय क्रमांकाने खंडेलवाल वल्लभ अनिल



श्रेयस चेन्नेकर तनवी कराळे वल्लभ खंडेलवाल प्राची साबळे



क्षितिज कुलकर्णी पुष्कराज काळे वेदांत भगत

७५.६७% तर तृतीय क्रमांकाने साबळे प्राची आनंदा ७५ टक्के हे विद्यार्थी विद्यालयामध्ये प्रथम आले असून वाणिज्य शाखेमध्ये प्रथम क्रमांक कुलकर्णी क्षितिज मकरंद ८२.३३द्वितीय क्रमांक काळे पुष्कराज अमित ७४.१७% तृतीय क्रमांक भगत वेदांत योगेश ७२.७% ने विद्यार्थी प्रथम आले असून त्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीमती विजया रेघे,माजी अध्यक्ष दि .ना जोशी, उपाध्यक्ष चंद्रशेखर वाल्मीक कुलकर्णी, सेक्रेटरी किरण सुधाकर, वैयकर खजिनदार व प्रगत विद्यालयाचे चेअरमन उमेश चंद्रकांत रेखे, कार्यकारणी सदस्य महेश चंद्रकांत रेखे, उदयकुमार अरुण भणगे, ॲड . रमेश रंगनाथ नगरकर, तसेच प्राचार्य सुनिल पंडित, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विद्या खडके, प्राध्यापिका हर्षाली देशमुख व सर्व शिक्षक शिक्षकेतर वृंदानी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेचे काम रेंगाळले

### सर्वपक्षीय कृती समितीच्यावतीने क्रांती चौकात तब्बल दोन तास रास्ता रोको !

**शेवगाव :** शेवगावकरांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेचे काम रेंगाळले आहे सध्या तीव्र उन्हाळ्यात शेवगावकरांना बारा ते पंधरा दिवसातून एकदा व तोही अल्प प्रमाणात पाणीपुरवठा सुरू आहे, त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या समस्येसह अन्य ज्वलंत प्रश्न बाबत नगरपरिषद प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने शहरातील क्रांती चौकात सोमवारी तब्बल दोन तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी तीव्र उन्हात आंदोलकांनी शेवगावकरांच्या रेंगाळलेल्या ज्वलंत प्रश्नाबाबत नगरपरिषद प्रशासनास जाब विचारून पाणी आमच्या हक्काचे लोकांना न्याय मिळेपर्यंत पुकारण्यात आलेले जन आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार जाहीर केला त्यानंतर नगर परिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी आंदोलन स्थळी येऊन स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेच्या कामकाजाची सर्वपक्षीय कृती समितीच्या कार्यकर्त्यांसह जनतेला सविस्तर माहिती देण्यात येईल तसेच नागरिकांच्या हरकती व सूचना विचारात घेऊन स्वतंत्र पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करून शेवगावकरांना मुबलक पाणीपुरवठा करण्याची ग्वाही दिल्यानंतर पुकारण्यात आलेले जन आंदोलन स्थगित करण्यात आले . शहरासाठीच्या नवीन स्वतंत्र पाणीपुरवठा योजनेचे काम कासवाच्या संथ गतीने सुरू आहे, नवीन योजनेसाठी प्रस्तावित साठवण टाक्या पाणी साठवण क्षमता योजनेत समाविष्ट असलेल्या शहरा नजीकच्या वाड्या वस्त्या नळ कनेक्शन अंतर्गत पाईप लाईन याबाबत सर्वपक्षीय पुढाऱ्यांना तसेच शहरातील जनतेला विश्वासात घेण्यात आलेले नाही पुढील तीस वर्षाचे नियोजन गृहीत धरून पाणी योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे मात्र योजने नंतर शहरातील नागरिकांना किमान दररोज मुबलक पाणीपुरवठा होईलच याबाबत जनतेच्या मनात शंका कुशंका असल्याने नगरपरिषद प्रशासनाने योजनेचे ठेकेदार तसेच तांत्रिक सल्लागार प्रतिनिधींच्या उपस्थितीत सविस्तर बैठक घेऊन नागरिकांना विश्वासात घ्यावे याशिवाय शहरातील सर्वच प्रमुख रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात आले आहे मात्र पडलेला रोडा,, दगड, माती रस्त्याच्या कडेला असलेल्या साईड गटारी मध्ये साचून साईड गटारी बुजल्या आहेत. त्यामुळे सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले असून जनतेच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे त्यामुळे साचलेला रोडा व दगड माती अन्य सोयीस्कर ठिकाणी टाकण्यात यावी शहराच्या हम रस्त्यावर शासकीय नियमानुसार खुणा निश्चित करून मिळाव्यात घनकचरा व्यवस्थापनाचे नियोजन देखील कोलमडले आहे एकंदरीत पिण्याच्या पाण्यासह शहरातील नालेसफाई घंटागाडी स्ट्रीट लाईट आरोग्य फवारणी आदी रेंगाळलेल्या मूलभूत प्रश्नांबाबत नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने जनतेच्या तीव्र



भावना व्यक्त करण्यासाठी सर्वपक्षीय कृती समितीचे सोमवारचे रस्ता रोको आंदोलन नगरपरिषद प्रशासनास एक प्रकारचा इशारा असल्याच्या भावना यावेळी बोलताना अनेकांनी व्यक्त केल्या नगरपरिषद प्रशासनाने सविस्तर बैठक घेऊन सर्व समस्यांचा निपटारा व्हावा यासाठी कालबद्ध कृती आराखडा जाहीर करावा अन्यथा या पुढील काळात कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने प्रसंगी गाव बंद नगरपरिषद कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल असा निर्धार जाहीर करण्यात आला नगर परिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे यांनी आंदोलन स्थळी येऊन आंदोलकांच्या मागण्यां बाबत तातडीने कार्यवाही करण्याचे मान्य केल्यानंतर तब्बल दोन तासाने पुकारण्यात आलेले रास्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याचे संयोजकांनी जाहीर केले. आंदोलनात भारतीय जनता पक्षाचे प्रदेश चिटणीस अरुण मुंडे पंचायत समितीचे माजी सभापती अरुण लांडे वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्राध्यापक किसन चव्हाण भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे कॉम्रेड सुभाष पाटील लांडे राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष हरीश भारदे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ॲड अविनाश मगरे माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण कॉम्रेड संजय नांगरे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे दत्तात्रय फुंदे राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाच्या युवक संघटनेचे प्रदेश चिटणीस नंदकुमार मुंढे तालुकाध्यक्ष संतोष जाधव, बाळासाहेब डाके, कमलेश गांधी ,धनंजय डहाळे ,अमोल सागडे राजेंद्र मेहेर, विजयराव देशमुख, नितीन फुंदे, दत्ता आरे, राहुल सावंत, अंकुश कुसळकर यांच्यासह कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते पोलीस निरीक्षक समाधान नागरे सहाय्यक पोलीस निरीक्षक धरम सिंह सुंदरडे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## माजी उपसरपंच लताबाई कराळे हत्याकांडातील आरोपींना तात्काळ अटक करा

### पिंपळगाव माळवीच्या ग्रामस्थांनी घेतली पोलीस अधीक्षकांची भेट

**अहिल्यानगर** - मौजे पिंपळगाव माळवी येथील माजी उपसरपंच लताबाई नानाभाऊ कराळे यांची निर्गुण हत्या करणाऱ्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी शिव प्रहार संघटनेच्या वतीने व पिंपळगाव माळवी च्या ग्रामस्थांच्या वतीने पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले यावेळी शिव प्रहार संघटनेचे युवक तालुकाप्रमुख गोरक्षनाथ आढाव समवेत पिंपळगाव माळवी ग्रामस्थ आशा आढाव, वैशाली आढाव, मनीषा कराळे, अनिल वाघ, गोरक्षनाथ रणसिंग, नानाभाऊ कराळे, जालिंदर कराळे, सागर गुंड, भरत आढाव, धोंडीभाऊ कराळे, जालिंदर काळे, संगीता काळे, आशा गुंड, कांचन गुंड, शरीफा शेख आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, मौजे पिंपळगाव माळवी येथील माजी उपसरपंच कै. लताबाई नानाभाऊ कराळे यांची दि. १३ फेब्रुवारी रोजी दुपारी निर्गुण पणे हत्या करण्यात आलेली आहे. सदर हत्येला तीन महिने उलटून देखील अजूनही कुठल्याही प्रकारचा तपास लागलेला नाही. अंत्यविधीच्या वेळी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी यांनी आश्वासन दिले होते दोन दिवसात तपास लाऊ मात्र तीन महिने होऊन देखील कुठल्याही प्रकारचे आरोपी सापडले नाही. त्यामुळे मौजे पिंपळगाव माळवी येथील महिला व ग्रामस्थ भयभीत झालेले आहे. तसेच गावांमध्ये पोलीस प्रशासना विरोधात ग्रामस्थांचा असतोष निर्माण झाला आहे. हा तपास पोलीस यंत्रणेंनी गहाळ केला की काय? अशी उलट सुलट चर्चा पिंपळगाव माळवी सह परिसरातील गावांमध्ये चालू आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक यांनी येत्या ८ दिवसाच्या आत तपास लावावा अन्यथा शिव प्रहार संघटना व मौजे पिंपळगाव माळवी ग्रामस्थ पीडित कुटुंबीयांसह मंगळवार दिनांक १३ मे रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करणार असल्याचे सांगितले आहे.

